# बिसेन डेन्टल केअर

डॉ.दिप(पंकज) बिसेन डॉ.खुशबू बिसेन(पटले)



दंत व मुख रोगविशेषज्ञ
बी.डी.एस.(नागपूर)



ताज मेरीप्लेक्स, गर्ल्स कॉलेज रोड गोंदिया

सकाळी:- ११ ते ३ सायं ६ ते ९ वाजेपर्यंत संपर्क:- ९५४५६८१८७०



सामाहिक http://berartimes.com

# बेरार टाईम्स

संपादक :- खेमेंद्र कटरे, सहसंपादक :- सुरेश भदाडे






बेरार टाईम्स द्वारा प्रकाशित पर्यटन पुस्तिका उपलब्ध अंक व जाहिरातकरिता संपर्क स्थळ



आर.एन.आय.क्र. एमएएचएमएआर/२०११/४६५१० | वर्ष -१० गोंदिया | अंक २२ | बुधवार,दि.०५ मे २०२१ | पृष्ठ-४ | किंमत-३ रुपये | Postal Reg.No.NPMFL/107/2019-2021


# मोहफुलांच्या माध्यमातून आदिवासींचे सक्षमीकरण होणार-मुख्यमंत्री उद्धव ठाकरे

**मुंबई :** मोहफुलांच्या माध्यमातून आदिवासींचे सक्षमीकरण करणे शक्य होणार आहे, असा विश्वास मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी खारगे समितीच्या शिफारशी स्वीकारल्यामुळे व्यक्त केला आहे. वनविभागाचे तत्कालिन प्रधान सचिव विकास खारगे यांच्या समितीच्या शिफारशी मान्य करून मोहफुलांवरील निर्बंध हटविण्याबाबत गृह विभागाने तसा शासन निर्णय काढला आहे. राज्य उत्पादन शुल्क कायद्यातील बदलाबाबत वन विभाग, आदिवासी विकास आणि राज्य उत्पादन शुल्क या तीनही विभागांच्या अधिकाऱ्यांनी मुख्य सचिवांकडे एकत्रित बसून कायद्यात नेमके कोणते बदल करायचे याबाबत निर्णय घ्यावा असे निर्देश मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी दिले होते. विधानसभेचे तत्कालीन अध्यक्ष नाना पटोले यांनी सातत्याने यासाठी पाठपुरावा केला होता. तत्कालीन राज्य उत्पादन शुल्क मंत्री दिलीप वळसे पाटील यांच्यासमवेत देखील मुख्यमंत्र्यांकडे बैठक झाली होती.

मोहफुलाचा वृक्ष हा आदिवासींसाठी कल्पवृक्ष असून यात मोठ्या प्रमाणात अन्नघटक व पोषणमूल्य दडलेले आहे. मोहफुलांचे प्रक्रिया उद्योग सुरू झाल्यास आदिवासी बांधवांना मिळणाऱ्या उत्पन्नात वाढ होईल व त्यांचे जीवनमान उंचावण्यास मदत होईल हे लक्षात घेऊन खारगे समितीने अहवालात विविध शिफारसी केल्या होत्या. त्यामध्ये मोहफुलाला वनविभागाच्या वाहतूक परवान्यातून मुक्त करणे व आदिवासींना मोहफुलाचे संकलन आणि साठवणूक याबाबतची राज्य उत्पादन शुल्क विभागाची असलेली मर्यादा रद्द करणे अशा शिफारशीही होत्या. निर्बंध हटविण्याच्या निर्णयामुळे आता मोहफुल गोळा करण्यापासून त्याची वाहतूक करण्यापर्यंत आता कुठलीही परवानगीची गरज राहणार नाही.



मोहफुले जमा करण्याचा नमुना एफ एम ३ परवाना, खरेदी करण्याचा एफ एम ४ आणि वाहतुकीचा एफ एम ५ हे परवाने आता लागणार नाहीत. मोहफुलांच्या परराज्यातून होणा?्या आयातीवर मात्र निर्बंध असतील असे या शासन निर्णयात म्हटले आहे.

निर्यातीसाठी मात्र एफ एम ७ परवाना आवश्यक राहील. मोहफुल साठवणूक, विक्री व व्यापार करण्यासाठी एफ एम ७ ही अनुज्ञप्ती नव्याने मंजूर करण्यावर मात्र शासनाने निर्बंध घातले आहेत. खासगी व्यक्ती या वर्षाकील ५०० क्विंटल या कमाल मर्यादेत मोहफुलांचा कोटा ठेवू शकते. मोहफुलाच्या व्यापाराकरिता एफ एम २ अनुज्ञप्ती मंजूर करून घ्यावी लागेल. आदिवासी विकास संथा, महिला बचत गटांनाच ती मिळेल. अनुज्ञप्त्या मंजूर करताना मोहफुलांचा गैरवापर होणार नाही यासाठी दंडात्मक आणि फौजदारी कारवाईची तरतूदही करण्यात आली आहे

# कोरोनाचा वाढता प्रादूर्भाव पाहता सुक्ष्म नियोजन करा-पालकमंत्री नवाब मलिक

**गोंदिया :** कोरोनाचा वाढता प्रादुर्भाव व तिसऱ्या लाटेची शक्यता लक्षात घेता खाटांची उपलब्धता, ऑक्सिजन, रेमडेसिवीर व औषधांचा साठा उपलब्धतेबाबत सुक्ष्म नियोजन करा, असे निर्देश पालकमंत्री नवाब मलिक यांनी जिल्हा प्रशासनाला दिले.



जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित कोविड आढावा बैठकीत ते बोलत होते. जिल्हाधिकारी दीपक कुमार मीना, मुख्य कार्यकारी अधिकारी प्रदीपकुमार डांगे, जिल्हा पोलीस अधिक्षक विश्व पानसरे, अप्पर जिल्हाधिकारी राजेश खवले, शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. नरेश तिरपूडे, प्रभारी जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. प्रशांत तुरकर, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. नितीन कापसे, एफडीए अधिकारी संदीप नरवने व विविध विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

कोरोनाचा वाढता प्रादूर्भाव लक्षात घेता उपलब्ध खाटांची संख्या वाढविण्यात यावी. यासाठी प्रत्येक ग्रामीण रुग्णालयात अतिरिक्त खाटा उपलब्ध करुन त्या ठिकाणी पुर्णवेळ ?म्बुलन्स ठेवावी अश्या सूचना आरोग्य विभागाला दिल्या. रुग्णालयामध्ये डॉक्टरांची कमतरता असेल तर वैद्यकीय क्षेत्रात अंतिम वर्षात शिक्षण घेणा?्या विद्यार्थ्यांना प्रेरित करून कोविड काळात त्यांची सेवा घ्यावी, असे त्यांनी यावेळी सांगितले.

१ मे पासून १८ वर्षावरील नागरिकांचे लसीकरण सुरू झाले असून लसीकरण केंद्रांवर अनावश्यक गर्दी होऊ नये म्हणून प्रत्येक लसीकरण केंद्राच्या क्षेत्रानुसार कॉल सेंटर सुरू करावे व लाभार्थ्यांची नोंदणी करावी. लाभार्थ्यांना एसएमएसव्दारे लसीकरणाची तारीख व वेळेची माहिती देण्यात यावी त्यामुळे लसीकरण केंद्रावरील अनावश्यक गदी टाळता येईल अशा सूचना त्यांनी यावेळी प्रशासनाला दिल्या.

जिल्हा क्रीडा संकूल गोंदिया येथे १५० खाटांची क्षमता असलेल्या डेडिकेटेट कोविड सेंटरचे फित कापून उद्घाटन केले. सोबतच ५ ॲम्बुलन्स व ३ अग्निशमन वाहनांना पालकमंत्र्यांनी हिरवी झेंडी दाखवून लोकार्पण केले.

**सडक/अर्जुनी व गोंदिया रुग्णालयाची पाहणी**

ग्रामीण रुग्णालय सडक/अर्जुनी, केटीएस जिल्हा सामान्य रुग्णालय व जिल्हा क्रीडा संकूल येथील कोविड केअर हॉस्पिटलला पालकमंर्त्यांनी भेट देऊन पाहणी केली. उपचार घेत असलेल्या रुग्णांना देण्यात येत असलेल्या सोई सुविधांचा आढावा त्यांनी या भेटीत घेतला. रुग्णांना नियमित उपचार द्यावे, जेवणाचा दर्जा उत्तम असावा, स्वच्छता ठेवावी व रुग्णांचे समुपदेशन, योगा इत्यादी सुविधा उपलब्ध करून द्याव्यात असे त्यांनी या भेटीत सांगितले. यावेळी सडक अर्जुनी ग्रामीण रुग्णालय येथे लस घेण्यासाठी आलेल्या नागरिकांशी पालकमंर्त्यांनी संवाद साधला.

आमदार सर्वश्री अभिजीत वंजारी, विनोद अग्रवाल, मनोहर चंद्रीकापूरे, जिल्हाधिकारी दीपक कुमार मीना, मुख्य कार्यकारी अधिकारी प्रदीपकुमार डांगे, पोलीस अधिक्षक विश्व पानसरे, नगराध्यक्ष अशोक इंगळे, शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ.नरेश तिरपुडे, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.नितीन कापसे, प्रभारी जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.प्रशांत तुरकर, नगर परिषद मुख्याधिकारी करण चव्हाण, उपविभागीय अधिकारी वंदना सवरंगपते, शिक्षणाधिकारी राजकुमार हिवारे, तहसिलदार आदेश डफळ, अपर तहसिलदार अनिल खडतकर, बाई गंगाबाई रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ.सागर सोनारे उपस्थित होते.

# राज्य वन्यजीव गुन्हे नियंत्रण शाखा स्थापनेबाबत उदासीनता, वाघांच्या मृत्यूंचे सत्र सुरूच

**नागपूर :** भारतात गेल्या साडेतीन महिन्यांच्या कालावधीत सुमारे ४०पेक्षा अधिक वाघ मृत्युमुखी पडले. त्यापैकी ६४ टक्के मृत्यू एकट्या महाराष्ट्रातील असून अर्धेअधिक मृत्यू शिकारीकडे अंगुलीनिर्देश करणारे आहेत. त्यामुळे केंद्राच्या धर्तीवर राज्यातही राज्य वन्यजीव गुन्हे नियंत्रण शाखा स्थापन करण्यासंबंधीचा विषय राज्य वन्यजीव मंडळाच्या बैठकीत ठेवण्यात यावा, याविषयी मुख्य वन्यजीव रक्षकांना पत्र देण्यात आले होते. मात्र, मंडळ सदस्याने केलेली सूचना फारशी गांभीर्याने घेतली गेली नाही. परिणामी, राज्यात वन्यप्राण्यांच्या, विशेषकरून वाघांच्या संशयास्पद मृत्यूचे प्रमाण वाढलेले दिसून येत आहे.

वन्यजीवांच्या शिकारी, त्यांच्या अवयवांचा अवैध व्यापार आणि स्थानिक शिकाऱ्यांना हाताशी धरून सक्रिय झालेल्या आंतरराष्ट्रीय टोळ्यांना शह देणारी वनखात्याची प्रशासकीय यंत्रणा कमी पडत आहे. महाराष्ट्रात बहेलिया शिकाऱ्यांनी मांडलेला उच्छाद कमी झाल्यानंतर वनखाते सुस्तावले. राज्यात नवीन वर्षाच्या पहिल्याच दिवशी उमरेड-करांडला अभयारण्यात दोन बछड्यांसह वाघिणीचा संशयास्पद मृत्यू झाला.

यवतमाळ जिल्ह्यात एक महिन्याच्या अंतराने दोन वाघ मृत्युमुखी पडले. या दोन्ही घटनांमध्ये शिकाऱ्यांनी वायर ट्रॅपचा वापर केला होता. काही दिवसांपूर्वीच्या घटनेत वाघिणीला थेट जिवंत जाळण्याचा प्रयत्न झाला. या घटनेने ङ्गराज्य वन्यजीव गुन्हे नियंत्रण शाखेफ्ची गरज आणखी तीव्र झाली आहे. अजूनही अशा शिकारीच्या घटनांचा पाठपुरावा करण्यात वनखात्याची यंत्रणा कमी पडत आहे. सायबर डाटा, न्यायालयीन घटनांचा पाठपुरावा

> महाराष्ट्रात मेळघाट येथे एकच वन्यजीव गुन्हे कक्ष असून त्यालाही मर्यादा आहेत. २०१३ मध्ये या व्याघ्रप्रकल्पात उघडकीस आलेल्या शिकारीच्या घटनांची चौकशी करताना याचा पुरेपूर अनुभव आला. त्यामुळे ङ्गराज्य वन्यजीव गुन्हे नियंत्रण शाखाफ स्थापन केल्यास वन्यजीव गुन्ह्यावर नियंत्रण आणणे सोपे होईल. याच उद्देशाने राज्य वन्यजीव मंडळाच्या सोळाव्या बैठकीपूर्वी राज्याच्या मुख्य वनसंरक्षकांना हा विषय मंडळाच्या बैठकीत ठेवण्याविषयीचा प्रस्ताव दिला होता. त्यावर लवकरात लवकर कार्यवाही होणे अपेक्षित आहे. कारण महाराष्ट्रात शिकारीचे प्रमाण आणि शिकारीचा धोका अधिक आहे.
>
> **यादव तरटे पाटील, सदस्य, राज्य वन्यजीव मंडळ.**

यात यंत्रणा तोकडी पडत असल्यानेच शिकाऱ्यांना शिक्षा मिळण्याचे प्रमाणही कमी आहे. २०१९ मध्ये १९ वाघांच्या मृत्यूंपैकी पाच प्रकरणात शिकारीचे गुन्हे नोंदवण्यात आले. मात्र, अजूनही त्याचा तपास पूर्ण झालेला नाही. तर याच वर्षांत ११० बिबट मृत्युमुखी पडले. त्यातील १७ प्रकरणात शिकारीचे गुन्हे नोंद झाले, पण तपास पूर्ण झालेला नाही. केंद्रीय वन्यजीव गुन्हे नियंत्रण शाखा एक प्रादेशिक संचालक, दोन पोलीस निरीक्षक आणि तीन शिपायांसह महाराष्ट्र, गुजरात आणि गोवा या तीन राज्य आणि एका केंद्रशासित प्रदेशाची जबाबदारी सांभाळत आहे. त्यामुळे वन्यजीव गुन्ह्यांवर नियंत्रण ठेवणे कठीण जात आहे. केंद्रीय वन्यजीव गुन्हे शाखेने केलेल्या शिफारशीच्या आधारावर महाराष्ट्रात राज्य वन्यजीव गुन्हे शाखा स्थापन करण्याची आवश्यकता व्यक्त केली जात आहे.

# राज्यात १५ मेपर्यंत लॉकडाऊन

**मुंबई :** गेल्या काही दिवसांपासून राज्यात सुरू असलेल्या चर्चेवर अखेर पडदा पडला असून राज्य सरकारने सध्या राज्यात सुरू असलेला लॉकडाउन १५ मे पर्यंत वाढवला आहे. राज्य सरकारने यासंदर्भात आदेश काढला असून त्यानुसार आत्ता राज्यात लागू असलेले निर्बंध १५ मे रोजी सकाळी ७ वाजेपर्यंत लागू असणार आहेत. राज्याचे आरोग्यमंत्री राजेश टोपे यांनी बुधवारी राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीनंतर बोलताना यासंदर्भातले संकेत दिले होते. राज्यात १५ दिवस किंवा त्याहून जास्त काळासाठी लॉकडाउन वाढवला जाऊ शकतो, अशी शक्यता त्यांनी वर्तवली होती. त्यानुसार आज राज्य सरकारने स्वतंत्र आदेश काढून राज्यात सध्या लागू असलेले निर्बंध १५ मे पर्यंत कायम राहतील असं जाहीर केलं आहे.

राज्यात १४ एप्रिलपासून सरकारने कोरोनाबाबतचे निर्बंध लागू केले होते. त्यामध्ये २२ एप्रिलपासून लॉकडाउनच्या कठोर निर्बंधांचा समावेश करण्यात आला होता. आधीच्या आदेशांनुसार हे निर्बंध १४ एप्रिल रोजी संध्याकाळी ८ वाजेपासून १ मे रोजी सकाळी ७ वाजेपर्यंतच लागू असणार होते. मात्र, राज्यातील रुग्णवाढीचा दर आणि मृतांची वाढतच जाणारी संख्या पाहाता लॉकडाउनमध्ये वाढ करण्याची भूमिका अनेकांनी मांडली होती.

# महाज्योतीच्या ढिसाळ कारभारावर टीका

**नागपूर :** मागासवर्गीय विद्यार्थ्यांना प्रशिक्षण, मार्गदर्शन करून त्यांच्या प्रगतीच्या वाटा सुकर करण्याच्या हेतूने स्थापन महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था (महाज्योती)च्या ढिसाळ कारभाराचे धिंडवडे निघत आहेत. संस्थेने तीन महिन्याआधी घेतलेल्या निबंध स्पर्धेचा निकाल घोषित केलेला नाही, यूपीएससी आणि पीएचडी विद्यार्थ्यांना मदत करण्यातही संस्था अपयशी ठरली असून राज्यभरातील उमेदवार या संस्थेच्या कारभारावर तीव्र नाराजी व्यक्त करत आहेत.

महाज्योतीने जानेवारी महिन्यात निबंध स्पर्धा आयोजित केली होती. या स्पर्धेत सहभागी होण्यासाठी प्रत्येक जिल्ह्यातून तीन उमेदवाराला पात्र ठरवण्यात आले. राज्यातील १०८ विद्यार्थ्यांनी स्पर्धेत भाग घेतला. फेब्रुवारीच्या पहिल्या आठवड?ात निकाल लागणार होता. परंतु निबंध स्पर्धेचा निकाल लागलाच नाही.

बार्टीच्या धर्तीवर संघ लोकसेवा आयोगाच्या परीक्षेची तयारी उमेदवारांकडून करवून घेण्यासाठी योजना सुरू करण्याचा निर्णय घेतला. त्यासाठी महाराष्ट्र आणि दिल्लीतील खासगी प्रशिक्षण संस्थांकडून निविदा मागवली. यासंदर्भात जाहिरातीला अडीच महिने झाले. परंतु त्या योजनेचे काय झाले, उमेदवारांना प्रशिक्षण केव्हा दिले जाईल, त्यासाठी निवड प्रक्रिया कशी असेल, याबद्दल काहीही महाज्योती उमेदवारांना सांगत नाही. अशाच प्रकारे पीएचडी करणाऱ्यांसाठी योजना सुरू करण्यात येत असल्याचे सांगितले आहे. मात्र, योजना केव्हा सुरू होईल, त्यात सहभागी होण्याचे निकष काय, यासंदर्भात संस्थेकडून उमेदवारांना मार्गदर्शन, माहिती मिळत नाही. महाज्योती कार्यालयाचे दूरध्वनी बंद राहतात किंवा उचलले जात नाहीत, अशा अनेक तक्रारी आहेत. यूपीएससीची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांना आर्थिक अडचणींना सामोरे जावे लागते.

> **पूर्णवेळ व्यवस्थापकीय संचालक नसल्यामुळे संस्थेच्या कारभारावर मर्यादा येत आहेत. म्हणून पूर्णवेळ एम.डी. नेमण्याची आणि दर महिन्याला संचालक मंडळाची बैठक बोलावण्याची मागणी बहुजन कल्याण मंत्री आणि संस्थेचे अध्यक्ष विजय वडेट्टीवार यांच्याकडे केली आहे. लवकरच आपण मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनाही पत्र लिहिणार आहोत.**
>
> **- लक्ष्मण वडले, संचालक, महाज्योती**

त्यामुळे बार्टीने तसेच टीआरटीने आदिवासी उमेदवारांना आर्थिक मदत सुरू केली आहे. महाज्योतीने मात्र अद्याप सुरू केलेली नाही. एकूणच या संस्थेने ज्या पद्धतीने विद्यार्थ्यांच्या योजना हाती घ्यायला हव्या, त्यावर काम करायला हवे, तसे होत नाही, अशी तक्रार यूपीएससीची तयारी करत असलेले ऋषिकेश चव्हाण यांनी केली.

गेल्या दोन वर्षांत महाज्योतीने केवळ पोलीस भरतीपूर्व प्रशिक्षण सुरू केले आहे. करोनामुळे तेही ऑनलाईन सुरू आहे. मात्र, यासाठी डिजिटल प्लेटफार्म उपलब्ध करून देणाऱ्या पुण्याच्या कन्सलटन्टचे देयक संस्थेला देता आले नाही.

मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी उपक्रम, योजना राबवण्यासाठी या संस्थेकडे कल्पना आहेत. परंतु त्या राबणारी यंत्रणा नाही. खुद्द व्यवस्थापकीय संचालक महाज्योतीच्या कार्यालयात तीन महिन्यांपासून आलेले नाहीत. ते गोंदिया जिल्ह्याचे मुख्य कार्यकारी अधिकारी आहेत. त्यांच्याकडे करोनाची स्थिती हाताळण्याची जबाबदारी आहे. नागपुरात कार्यालय असलेल्या महाज्योतीला ते वेळ देऊ शकत नाही. त्यांच्याकडमून कारभार काढून नागपुरातील एखाद्या भारतीय प्रशासकीय सेवेतील अधिकाऱ्यांकडे जबाबदारी देण्याची मागणी होत आहे.

# सुवर्णा माने राज्यातील पहिल्या महिला आयएफएस अधिकारी

**सोलापूर :** महाराष्ट्राच्या सुवर्णा रवींद्र माने-झोळ यांची राज्यसेवेतून केंद्रीय सेवेत पदोन्नती झाली. त्यांची २०१६ च्या भारतीय वनसेवेच्या (आयएफएस) तुकडीत नियुक्ती झाली असून राज्यसेवेतून वनविभागात या पदावर जाणा?्या त्या राज्यातील पहिल्या महिला अधिकारी ठरल्या आहेत.




यापूर्वी राज्यात वनविभागात विविध पदांवर महिला अधिकाऱ्यांनी काम केले आहे, परंतु राज्यसेवेतून आयएफएस होणाऱ्या त्या पहिल्या महिला आहेत. वनविभागात आजपर्यंत वनरक्षक, वनपाल, वनक्षेत्रपाल या पदावर महिलांनी काम केले होते, परंतु २००९ मध्ये महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत पहिल्यांदाच सहाय्यक वनसंरक्षक या वर्ग १ च्या पदावर ८ महिला व २५ पुरुषांची नियुक्ती केली गेली. काल त्याच तुकडीचे ६ अधिकारी भारतीय वनसेवेत दाखल झाले असून त्यापैकी सुवर्णा माने या एकमेव महिला आहेत. या पदावर राज्यसेवेतून जाणाऱ्या माने या राज्यातील पहिल्या महिला ठरल्या आहेत.

केंद्रीय लोकसेवा आयोगामार्फत भारतीय प्रशासकीय सेवा (आयएएस), भारतीय पोलीस सेवा (आयपीएस) व भारतीय वन सेवा (आयएफएस) या तीन अखिल भारतीय सेवेमध्ये सरळसेवेने व राज्यसेवेतून पदोन्नातीने अधिकाऱ्यांची नियुक्ती करते. त्यात भारतीय वनसेवेत सुवर्णा माने यांची निवड झाली असून त्यांचा समावेश २०१६ च्या तुकडीमध्ये करण्यात आला आहे.

सुवर्णा माने या मूळच्या सोलापूर जिल्ह्यातील करमाळा तालुक्यातील वशिंबे या गावच्या असून त्यांचे सासर वैराग, (तालुका-बार्शी) हे आहे. त्यांचे पती रवींद्र माने हेही सध्या प्र. जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी पदावर सोलापूर येथे कार्यरत आहेत.

# रुग्णांना चांगल्याप्रकारची सेवा उपलबब्ध करुन दया-राज्यमंत्री संजय बनसोडे

**गोंदिय :** जिल्ह्यात कोरोना बाधितांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. जिल्ह्यात कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी सर्व यंत्रणांनी सज्ज राहून रुग्णांना चांगल्याप्रकारची सेवा उपलब्ध करुन दयावी, असे निर्देश पाणी पुरवठा व स्वच्छता राज्यमंत्री संजय बनसोडे यांनी दिले.



१ मे रोजी जिल्हाधिकारी कार्यालयातील जिल्हा नियोजन समितीच्या सभागृहात कोरोना प्रतिबंधात्मक उपाययोजना बाबत आढावा घेण्यात आला, त्यावेळी ते बोलत होते. सभेला आमदार विनोद अग्रवाल, आमदार मनोहर चंद्रिकापुरे, माजी आमदार राजेंद्र जैन, जिल्हाधिकारी दीपक कुमार मीना, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रदिपकुमार डांगे, पोलीस अधीक्षक विश्व पानसरे यांची प्रामुख्याने उपस्थिती होती.

राज्यमंत्री श्री बनसोडे पुढे म्हणाले, रुग्णांची गैरसोय होणार नाही यासाठी जिल्ह्यातील बेडची संख्या वाढविण्यात यावी. ऑक्सीजन प्लांटची व्यवस्था करण्यात यावी. औषधांची आवश्यकता असेल तर त्वरित मागणी करा, जेणेकरुन रुग्णांची गैरसोय होणार नाही. कोविड केअर सेंटरवर योग्य त्या सोई-सुविधा उपलब्ध करुन दयावे. शासनाकडून कोणत्याही निधीची कमतरता नाही, त्यामुळे रुग्णांना ऑक्सीजन सिलेंडर व रेमडेसिवीर इंजेक्शनची सुविधा उपलब्ध करुन दयावी. गावा-गावामध्ये आरोग्य विभागामार्फत घरो-घरी जावून सर्वे करण्यात यावे. खाजगी रुग्णालयाचे नियमीत ऑडिट झाले पाहिजे. जिल्ह्यात ऑक्सीजनची उपलब्धता काय आहे याबाबत विचारणा करण्यात आली. ऑक्सीजन अभावी रुग्ण दगावला जाणार नाही याची दक्षता घेण्यात यावी.

शासनाकडे रेमडेसिवीर इंजेक्शनच्या पुरवठ्याची कमतरता नाही, त्यामुळे रेमडेसिवीर इंजेक्शन मागणीप्रमाणे वाटप करण्यात यावे. पोलीस यंत्रणेने लॉकडाऊन संचारबंदीमध्ये चोख बंदोबस्त ठेवावा. कोरोनाची तिसरी लाट येण्याची शक्यता आहे, त्यामुळे जिल्हा प्रशासनाने काय पुर्वतयारी केली आहे याबाबत विचारणा करण्यात आली. त्यावर जिल्हाधिकारी श्री मीना यांनी कोरोनाची तिसरी लाट येण्याची शक्यता असल्यामुळे जिल्हा प्रशासनाची पुर्वतयारीबाबतचे नियोजन विस्तृतपणे सांगितले.

आमदार विनोद अग्रवाल म्हणाले, टेस्टींग वाढविल्या पाहिजे. जनरल सर्वे करण्याची आवश्यकता आहे. सात-सात दिवस ठढ्ढझउठ रिपोर्ट येत नाही याबाबत त्यांनी नाराजी व्यक्त केली.

आमदार चंद्रिकापुरे म्हणाले, रुग्णांना चांगली सेवा देण्यासाठी रुग्णालयामध्ये मनुष्यबळ सक्षमपणे उभारण्यात यावे असे त्यांनी सांगितले.

माजी आमदार राजेंद्र जैन म्हणाले, ग्रामीण भागात सॅनिटायझर फवारणी झाली पाहिजे. तसेच ग्रामीण भागातील रुग्णालयात मेडिसीनची व्यवस्था करण्यात यावी. जास्तीत जास्त रेमडेसिवीर इंजेक्शन गोंदिया जिल्ह्यात आले पाहिजे असे त्यांनी यावेळी सांगितले.

सभेला अपर जिल्हाधिकारी राजेश खवले, निवासी उपजिल्हाधिकारी जयराम देशपांडे, उपजिल्हाधिकारी (निवडणूक) सुभाष चौधरी, उपजिल्हाधिकारी (रोहयो) सचिन गोसावी, नगरपरिषचे मुख्याधिकारी करण चव्हाण, शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ.नरेश तिरपुडे, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.नितीन कापसे, जिल्हा शल्यचिकित्सक यांचे प्रतिनिधी डॉ.प्रशांत तुरकर, ऋउअ चे अधिकारी संदीप नरवणे, जिल्हा पुरवठा अधिकारी देवराव वानखेडे, उपविभागीय अधिकारी वंदना सवरंगपते, तहसिलदार आदेश डफळ, अपर तहसिलदार अनिल खडतकर, जि.प.उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य) नरेश भांडारकर उपस्थित होते.

# रास्त भाव दुकानात लाभार्थ्यांना ई-पॉस मशिनवर अंगठा लावण्याची आवश्यकता नाही

**मुंबई :** राज्यातील कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव, कोरोनाची दुसरी लाट व त्याच्या संसर्गाने बाधित होत असलेल्या रुग्णांची वाढती संख्या विचारात घेता या विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी व त्यावर प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यासाठी राज्य शासनामार्फत वेळोवेळी सूचना देण्यात आल्या आहेत. त्याचा विचार करता सार्वजनिक वितरण व्यवस्थेमधील लाभार्थी तसेच रास्त भाव दुकानदार यांना कोरोनाचा संसर्ग होऊ नये यासाठी प्रतिबंधात्मक उपाय म्हणून रास्तभाव दुकानांमधून अन्नधान्याचे वितरण करताना लाभार्थ्यांची बायोमेट्रीक पडताळणी न करता रास्तभाव दुकानदारांनी त्यांचे स्वत:चे आधार अधिप्रमाणित करून धान्य वाटप करण्याची सुविधा १ मे, २०२१ पासून एक महिन्याच्या कालावधीसाठी कार्यान्वित करण्यात आली आहे. त्यामुळे आता लाभार्थ्यांना ई-पॉस मशिनवर अंगठा लावण्याची आवश्यकता राहणार नाही.



मात्र लाभार्थ्याने स्वत: रास्तभाव दुकानात उपस्थित राहणे आवश्यक आहे, असे अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागातर्फे प्रसिद्धीपत्रकाद्वारे जाहीर करण्यात आले आहे.

केंद्र शासनाच्या सूचनांनुसार एक देश एक रेशन कार्ड योजनेंतर्गत पोर्टेबिलिटीद्वारे अन्नधान्य वितरण करताना लाभार्थ्यांचे आधार प्रमाणित करुनच ई-पॉस मशिनद्वारे धान्य वितरित करण्यात येणार आहे.

मागील ३ ते ६ महिन्यात ज्या लाभार्थ्यांनी अन्न धान्याची उचल केलेली नाही अशा लाभार्थ्यांच्या शिधापत्रिकांवर अन्नधान्याचे वाटप झाल्याचे तसेच मागील ३ महिन्यांच्या धान्य वितरणाच्या सरासरीपेक्षा जास्त प्रमाणात धान्याचे वितरण केल्याचे निदर्शनास आल्यास संबंधित रास्तभाव दुकानांची तपासणी करण्याच्या सूचनाही क्षेत्रिय निरीक्षकांना देण्यात आल्या आहेत

राज्यातील राष्ट्रीय अन्न सुरक्षा योजनेचे सुमारे ७.०० कोटी लाभाथी तसेच शेतकरी आत्महत्याग्रस्त १४ जिल्ह्यांमधील ४० लाख एपीएल शेतकरी लाभार्थ्यांना सार्वजनिक वितरण व्यवस्थेमार्फत स्वत:चे आधार प्रमाणित करुन ई-पॉस मशिनद्वारे अन्नधान्याचे वितरण करण्यात येते.

## संपादकीय

# मध्यमवर्गाची वाताहात

कोरोनाच्या दुसऱ्या लाटेनं भारतातली अनेक मध्यमवर्गीय कुटुंबं मोडून पडली आहेत. काहींनी गावाकडच्या जमिनी, घरं विकून उपचारांसाठी पैशांची तजवीज केली आहे. काहींच्या राहत्या घरावरील कर्जाचा बोजा प्रमाणापलीकडे वाढला आहे. अनेक पगारदारांचे पगार कमी झाले असल्यामुळे लोक मिळेल ते पूरक काम स्वीकारून, अधिक राबून पैसा मिळवण्याच्या प्रयत्नात आहेत. एकंदरीत, मध्यमवर्ग चांगलाच अडचणीत आला आहे.

कोरोनानं माणसाच्या शरीरालाच नव्हे, तर मनालाही संसर्ग केला आहे. या भयावह साथीने एकीकडे माणसांच्या फुफ्फुसांवर आघात केला, तर दुसरीकडे अर्थचक्राची गती मंदावल्यामुळे माणसाच्या अर्थस्थितीवर घणाचा घाव पडला. सुरुवातीचे लॉकडाऊनचे टप्पे कसेबसे सहन केले असले तरी वर्षभरापेक्षा अधिक काळ ओढग्रस्त स्थिती कायम राहिल्यामुळे आज बहुसंख्य मध्यमवर्गीयांची स्थिती हाती ठणठण गोपाळ राहिल्यासारखी आहे. देशातल्या या एका महत्त्वाच्या वर्गाला मध्यमवर्ग म्हणायचं कारण कोणत्याही समाजव्यवस्थेत सर्वाधिक पिचला जाणारा हाच वर्ग असतो. त्याची अर्थस्थिती बेतास बेतच असते. त्यामुळे एखादा जोराचा अर्थफटकाही त्यांना मध्यमवर्गाच्या गटातून गरिबीच्या खाईत लोटण्यास पुरेसा असतो. मर्यादित उत्पन्न आणि वाढत्या खर्चाची तोंडमिळवणी करताना जेरीस येणारा हाच वर्ग आहे. त्याची ही स्थिती आज अधोरेखित होताना दिसत आहे.

गरजेपेक्षा जास्त पैसा असल्यानं बिघडलेल्या अर्थगतीचा श्रीमंतांना काही फरक पडत नाही, तर गरिबांच्या आणि दारिर्द्यररेषेखालच्या लोकांची बिकट अवस्था सर्वमान्य असल्यामुळे कोणत्याही प्रतिकूल स्थितीत सर्वप्रथम या वर्गाच्या पोटापाण्याची आणि आरोग्याची काळजी घेण्यासाठी शासकीय, प्रशासकीय यंत्रणा सज्ज होतात. त्यामुळे नाही म्हटलं तरी हा “नाही रे’ वर्ग एका संरक्षक छत्राखाली येतो. मात्र या दोन्ही वर्गांच्या मधल्या वर्गाला कोणत्याही सवलती मिळत नाहीत. नोकरदारांचा आयकर थेट कापला जात असतो. त्यातच मुलांच्या शिक्षणाचा वाढता भार, वृद्ध मातापित्यांचं आजारपण, मुला–मुलींच्या लग्नासाठी साठवणूक, प्रपंचाचा खर्च आणि आपल्या वृद्धावस्थेची बेगमी या सगळ्या भारात साधारणत: पस्तीशी–चाळिशीतच या वर्गातल्या कर्त्यांना अकाली वृद्धत्व आल्यासारखी स्थिती असते. कितीही धडपड केली तरी एक पाऊल पुढे टाकून नवश्रीमंतांमध्ये जाणं जमत नसतंच पण एखाद्या अतिरेकी खर्चानं एक पाऊल मागे घ्यावं लागलं, तर खूप बिकट अवस्था उद्भवणं अपरिहार्य असतं. असं असताना गेलं वर्षभर हा वर्ग कोणत्याही शासकीय मदतीशिवाय जेरीस आला नसता तरच नवल. त्यातच कोरोनावरचे औषधं आणि उपचार प्रचंड खर्चिक असल्यामुळे अनेकांच्या दीर्घकालीन बचतीदेखील वापरल्या जात आहेत. सहव्याधीसह कोरोना अनेकांच्या घरावरून वरंवटा फिरवत असल्यामुळे अनेकांच्या प्रपंचाची झालेली वाताहत शब्दांत वर्णन करण्याजोगी नाही. आई खायला घालेना आणि बाप भीक मागू देईना, अशा कात्रीत आज मध्यमवर्गीय अडकला असून त्यातले अनेक लोक दारिर्द्यरेषेखाली ढकलले गेले आहेत. काहींची तर हातातोंडाची गाठ पडणंही अवघड झालं आहे.

मुंबईच्या निकिताची आठ महिन्यांपूर्वी नोकरी गेली. आता ती आपल्या मित्रांसमवेत रेस्टॉरंटमध्ये जेवायला जात नाही. निकिता सांगते, “मी कधी कधी स्वतःला बाथरूममध्ये बंद करते. जेणेकरून ७१ वर्षीय आई मला रडताना पाहणार नाही.’ गेल्या आठवड्यात निकिताला एका कंपनीत मॅनेजरची नोकरी मिळाली. तिथे तिला ३० हजार रुपयांपेक्षा कमी पगार मिळत आहे. आधीच्या पगाराच्या निम्मंच वेतन आहे. ही दुसरी नोकरी गेली, तर आपण जगू शकणार नाही. आईला पाहणारी ती एकटीच आहे. आईला काही झालं तर रुग्णालयात दाखल करण्यासाठीही पैसे नाहीत, असं ती सांगते. नोएडाचे आशीष आनंद यांना फॅशन डिझायनर बनायचं होतं. नशिबानं त्यांना फ्लाइट अटेंडंट बनवलं. निवृत्त झाल्यानंतर त्यांनी दिल्लीच्या सरहद्दीवर कपड्यांचं दुकान सुरू केलं. यात त्यांनी कस्टम–डिझाइन केलेले सूट, शर्ट आणि पँटची विक्री सुरू केली.

आशीष यांनी २०२० च्या फेब्रुवारीमध्ये आपल्या नव्या दुकानाच्या उद्घाटनाच्या वेळी साडेतीन लाख रुपये खर्च केले होते. सासरच्या मंडळींकडून कर्ज घेतलं होतं. आता चांगली कमाई करून कर्ज फेडू, असं त्यांना वाटलं होतं. त्यांना मध्यमवर्गातून बाहेर पडून उच्च मध्यमवर्गात जाण्याचं स्वप्न पडायला लागलं होतं. पण मार्च २०२० मध्ये देशव्यापी टाळेबंदी लागू झाली आणि आशीष यांच्याकडे दुसऱ्या महिन्याचं भाडं भरण्यासाठीही पैसे शिल्लक राहिले नाहीत. नाईलाजानं दुकान बंद करावं लागलं. कोरोनामुळे आता त्यांचं कुटुंब दारिर्द्यरेषेखाली ढकललं गेलं आहे. ३८ वर्षीय आशीष आता सासऱ्यांवर अवलंबून आहे. कधी कधी संध्याकाळी त्यांच्या जेवणात चिकन आणि अंडी असत. आता दररोज डाळ–तांदूळ तर कधी खिचडी वाट्याला येते. आता त्यांच्या मुलांवर उपाशी झोपण्याची वेळही येत आहे. माझ्याकडे आता पैसे नाहीत. मी मुलांना कुठून अन्न देऊ, असं ते हताशपणे विचारतात.

सीएमआयच्या आकडेवारीनुसार, कोरोनाच्या पहिल्या लाटेमध्ये संघटित आणि असंघटित क्षेत्रासह सुमारे १२ कोटी लोक बेरोजगार होते. आता दुसऱ्या लाटेत १७ एप्रिल रोजी अडीच लाखांहून अधिक नवी प्रकरणं प्राप्त झाली आहेत. विविध राज्यांमधल्या बऱ्याच शहरांमधले कारभार बंद पडले असल्यामुळे परप्रांतीय कामगार परतायला लागले आहेत. या वेळेस स्थिती पूर्वीपेक्षा वाईट असल्याचं सांगितलं जात आहे. पहिल्या लाटेत एप्रिल ते जून २०२० दरम्यान देशाचा विकास दर २३.९ टक्क्यांनी खाली आला होता. मध्यमवर्गीयांच्या खिशातून याची भरपाई केली जात आहे. मार्च २०२० मध्ये जीएसटी संकलन सुमारे ९७ हजार कोटी होतं, जे मार्च २०२१ मध्ये २६ टक्क्यांनी वाढून एक लाख २३ हजार कोटींवर गेलं. कारण एफएमसीजी कंपन्यांनी दररोजच्या वापराच्या वस्तूंच्या किमती वाढवल्या. ३१ मार्च २०२० रोजी पेट्रोलची सरासरी किंमत प्रतिलिटर ७१.७५ रुपये आणि डिझेलची किंमत ६४.३४ रुपये होती. ३१ मार्च २०२१ रोजी पेट्रोल ९०.८२ रुपये आणि डिझेल ८१.१४ रुपयांवर गेलं. राजस्थानात हेच दर शंभर रुपयांच्या पलीकडे आहेत. सरकार उत्पादन शुल्क कमी करण्यास तयार नाही. मार्चमधल्या विजेच्या बिलातून मिळणारी कमाई एक वर्षापूर्वीच्या मार्चपेक्षा २२.८ टक्के जास्त आहे. राज्य सरकारांनी विजेवर स्वतंत्र सवलत बंद केली आहे. मध्यमवर्गीयांच्या व्यथा अशा व्यापक आहेत.

त्यातच अर्थव्यवस्थेत सुधारणा होण्याची शक्यता फारच कमी असल्याचं रिझर्व्ह बँकेचे माजी गव्हर्नर रघुराम राजन यांच्यासह अनेक अर्थशास्त्रज्ञांचं मत आहे, याचं कारण म्हणजे भारतात कोव्हिड लस घेण्याचं प्रमाण नऊ टक्क्यांपेक्षा कमी आहे. म्हणजेच एका दिवसात शंभरपैकी फक्त नऊजण लस घेत आहेत. या वेगानं भारतामध्ये कठोर प्रतिकारशक्ती विकसित होण्यास आणखी बराच काळ लागेल. दुसऱ्या लाटेचा प्रादुर्भाव होण्याचं हे प्रमुख कारण आहे. “न्यूयॉर्क टाइम्स’च्या वृत्तानुसार जागतिक अर्थव्यवस्था पुन्हा पूर्वपदावर येण्यासाठीही बराच काळ लागणार आहे. तोपर्यंत मध्यमवर्ग कसा तग धरणार हा खरा कळीचा प्रश्न आहे.

स्वामीत्व, मुद्रक, प्रकाशक व संपादक खेमेंद्र हिरदीलाल कटरे यांनी बेरार टाईम्स हे साप्ताहिक वृत्तपत्र अंगपाल पारधी, लोकजन प्रकाशन, लोकजन भवन, स्नेह नगर, तकिया वॉर्ड, भंडारा ता.जि.भंडारा येथे मुद्रीत करुन डोलारे एजन्सीजवळ चंचलबेन स्कूल रोड, गजानन कॉलनी गोंदिया येथे प्रकाशित केले. संपादक खेमेंद्र हिरदीलाल कटरे, भ्रमणध्वनी क्र. ८०८०९१५३२९ (पी.आर.बी. कायद्यानुसार जबाबदारी संपादकावर राहील) प्रसिद्ध झालेल्या मजकुराशी संपादक व प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. (गोंदिया न्यायकक्षेत)

# कोविडमुळे पालक गमावलेल्या अनाथ बालकांच्या असहायपणाचा फायदा घेणाऱ्या समाजकंटकांवर कठोर कारवाई–महिला व बालविकास विभागाचा इशारा

**मुंबई:** कोविड–१९ च्या आजारात दोन्ही पालक गमवावे लागलेल्या बालकांना बेकायदेशीररित्या दत्तक वा त्यांची विक्री करण्याचे प्रयत्न होत असल्याचे समाजमाध्यमांवरील पोस्ट पाहता दिसून येत आहे. अशा घटनांना रोखण्यासाठी त्याची माहिती मिळाल्यास १०९८ या हेल्पलाईनशी संपर्क साधावा अथवा स्टेट अडॉप्शन रिसोर्स एजन्सी ८३२९०४१५३१ या क्रमांकावर माहिती द्यावी, असे आवाहन महिला व बालविकास आयुक्तालयाने केले आहे. समाजकंटकांकडून अनाथ बालकांच्या असहाय्यतेचा गैरफायदा घेण्याच्या घटना गंभीर असून त्यावर कायद्यानुसार कठोर कारवाई केली जाईल, असेही विभागाने कळवले आहे.

कोरोना परिस्थितीत इतर अनेक समस्यांबरोबर बालकांच्या समस्यांमध्येही मोठ्या प्रमाणावर वाढ झाली आहे. या बालकांचे आरोग्य, संरक्षण, बालविवाह यासारख्या समस्यांसोबतच कोविड–१९ मुळे दोन्ही पालकांच्या मृत्यूमुळे अनाथ होण्याची गंभीर समस्या समोर येत आहे. अशा बालकांचा काही वेळा आप्तस्वकीयांकडून स्वीकार न झाल्यामुळे या समस्यांमध्ये अधिकच भर पडत आहे.

एकीकडे अशा बालकांचा प्रश्न गंभीर स्वरूप धारण करत असून काही समाजकंटक या समस्येचा वापर संधी म्हणून करून घेत परस्पर मुलांची विक्री करत असल्याचे चित्र समाजमाध्यमांवरील पोस्टवरून दिसून येत आहे. यासाठी फेसबुक, व्हॉट्सअॅप, इन्स्टाग्राम, ट्विटर आदी समाजमाध्यमांचा वापर करून त्यावर विविध भावनात्मक पोस्ट टाकल्या जात असून बालके दत्तकास उपलब्ध आहेत असे चित्र निर्माण केले जात आहे. हे समाजकंटक बालकांची विक्री करण्याची शक्यता नाकारता येत नाही. परंतु अशा प्रकारे बालकांना परस्पर दत्तक घेणे– देणे वा खरेदी–विक्री केली करणे हा कायद्यानुसार गंभीर गुन्हा आहे. अशाप्रकारचे कृत्य करणारी व्यक्ती भारतीय दंड संहिता १८६०, बालकांची काळजी व संरक्षण अधिनियम, २०१५ तसेच दत्तक नियमावली, २०१७ नुसार कठोर कारवाईस पात्र आहे.

राज्यात कोठेही कोविड–१९ च्या कारणाने पालक गमावल्यामुळे अनाथ झालेली बालके आढळून आल्यास १०९८ या हेल्पलाईन वर संपर्क साधावा अथवा सारा महाराष्ट्र (स्टेट अडॉप्शन रिसोर्स एजन्सी) च्या ८३२९०४१५३१ या क्रमांकावर कळवावे. तसेच प्रत्येक जिल्ह्यातील जिल्हा महिला व बालविकास अधिकारी कार्यालय, जिल्हा बाल संरक्षण कक्ष, बाल कल्याण समिती, व पोलीस यंत्रणेशी त्वरित संपर्क साधून या बालकांना ताब्यात द्यावे. त्यांची शासनामार्फत योग्य ती काळजी घेण्यात येईल.

ज्या पालकांना बालक दत्तक घ्यावयाचे आहे अशा पालकांसाठी कायदेशीर दत्तक विधान प्रक्रियेची सविस्तर माहिती केंद्र शासनाच्या ङ्कारा(सेंट्रल अडॉप्शन रिस–ोर्स अथॉरिटी) या प्राधिकरणाच्या www.cara.nic.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. त्या आधारे हे पालक दत्तकासाठी अर्ज नोंदणी करू शकतात, असेही महिला व बालविकास विभागाने कळवले आहे.

# राज्याचा औद्योगिक उत्पादन निर्देशांक वेबपोर्टलचा उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते शुभारंभ




**नांदेड :–** देशाच्या एकूण सकल उत्पन्नामध्ये महाराष्ट्राचा जवळपास १४ टक्के वाटा तर देशाच्या एकूण उत्पादनात १५ टक्के इतका वाटा आहे. उद्योग क्षेत्रात आपण अग्रेसर आहोत. राज्याच्या औद्योगिक प्रगतीसाठी वेळोवेळी आढावा घेवून योग्य नियोजन करणे हे आवश्यक असते. यासाठी मात्र औद्योगिक उत्पादन निर्देशांकाची अचूक माहित असणे आवश्यक असते. ही अचूक माहिती वेबपोर्टलच्या माध्यमातून आता सहज उपलब्ध होईल, असा विश्वास राज्याचे उपमुख्यमंत्री तथा वित्त व नियोजन मंत्री अजित पवार यांनी व्यक्त केला. या वेबपोर्टलचा शुभारंभ उपमुख्यमंत्री कार्यालयाच्या समिती कक्ष सभागृहात ऑनलाईन पद्धतीने झाला. यावेळी ते बोलत होते.

या छोटेखानी समारंभास उद्योग मंत्री सुभाष देसाई, उद्योग राज्य मंत्री आदिती तटकरे यांनी ऑनलाईन उपस्थिती दिली. अपर मुख्य सचिव (नियोजन विभाग) देबाशिष चक्रवती, अपर मुख्य सचिव (उद्योग विभाग) बलदेव सिंह, संचालक (अर्थ व सांख्यिकी संचालनालय) र.र. शिंगे, केंद्र शासनाच्या राष्ट्रीय सांख्यिकी कार्यालयाचे वरिष्ठ अधिकारी, अर्थ व सांख्यिकी संचालनालय व उद्योग संचालनालयाचे अधिकारी उपस्थित होते.

अपर मुख्य सचिव (नियोजन विभाग) देबाशिष चक्रवती, यांनी सर्व उपस्थितांचे स्वागत केले तर संचालक (अर्थ व सांख्यिकी संचालनालय) र.र. शिंगे यांनी प्रास्ताविक केले. या प्रकल्पामुळे भविष्यात उद्योग विषयक महत्त्वाच्या आकडेवारीची उपलब्धता होईल. औद्योगिक विकासाचे उद्दिष्ट साध्य करणे, राज्याचे औद्योगिक धोरण निश्चित करणे, औद्योगिक विकासाच्या योजना ठरविणे यासाठी औद्योगिक क्षेत्रातील चढउताराचे मोजमाप या दृष्टीने या वेबपोर्टलच्या निश्चित उपयोग होईल, असे उद्योगमंत्री सुभाष देसाई यांनी आपल्या मनोगतात यावेळी सांगितले.

या प्रकल्पामुळे भविष्यात उद्योग विषयक महत्त्वाच्या आकडेवारीची उपलब्धता होईल. राज्याच्या औद्योगिक विकासाचे उद्दिष्ट साध्य करणे, राज्याचे औद्योगिक धोरण निश्चित करणे, औद्योगिक विकासाच्या योजना ठरविणे व यासाठी औद्योगिक क्षेत्रातील चढउताराचे मोजमाप या दृष्टीने यासाठी या वेबपोर्टलचा निश्चित उपयोग होईल, असे प्रतिपादन उद्योगमंत्री सुभाष देसाई यांनी आपल्या मनोगतात केले.

## वॅक्सिंन कोरोना पासून सुरक्षेचा एकमात्र उपाय – लक्ष्मण नागपुरे



**सालेकसा:** कोरोना चा वाढता प्रादुर्भाव लक्षात घेता महाराष्ट्र शासनाच्या माध्यमातून संपूर्ण महाराष्ट्रात ४५ वयाच्या वरील सर्व नागरिकांना लसीकरण करण्यात येत आहे. त्याच अनुषंगाने कावराबांध ग्रामीण रुग्णालय येथे लक्ष्मण नागपुरे यांनी करोना लसीकरण करून घेतले त्यांच्यासोबत त्यांची पत्नी माझी जिल्हा परिषद सदस्य देवकाबाई नागपुरे यांनी लसीकरण केले. क्षेत्रातील नागरिकांना लसीकरण आवश्यक करण्याचे आव्हान लक्ष्मण नागपुरे यांनी केले आहे.

शासनाकडून दिली जाणारी लस ही पूर्ण पूर्ण सुरक्षित आणि गुणकारी आहे. त्यामुळे लसीकरण साठी शासनाला मदत करा व सुरक्षित राहण्याचे आवाहन केले आहे.

# जिल्ह्यात आज विक्रमी १३४९ रुग्णांना डिस्चार्ज

**भंडारा :–** जिल्ह्यात १३४९ रुग्ण बरे होऊन घरी गेले आहेत. बरे झालेल्या रुग्णांची संख्या ४३२०४ झाली असून आज ५७३ नवे कोरोनाबाधित रुग्ण आढळून आले आहेत. पॉझिटिव्ह रुग्णांची संख्या ५३१२७ झाली आहे. रुग्ण बरे होण्याचे प्रमाण ८१.३२ टक्के आहे.

३७९९ व्यक्तींच्या घशातील स्त्रावाचे नमुने तपासण्यात आले असून त्यापैकी ५७३ व्यक्ती कोरोना पॉझिटिव्ह आढळून आल्या आहेत. आतापर्यंत ०३ लाख ४३ हजार ७९० व्यकींच्या घशातील स्त्रावाची तपासणी करण्यात आली. त्यात ५३१२७ व्यक्ती कोरोना पॉझिटिव्ह आढळून आल्या.

जिल्ह्यात कोरोना पॉझिटिव्ह आलेल्या मध्ये भंडारा तालुक्यातील २०७, मोहाडी ३२, तुमसर ४५, पवनी २६, लाखनी ५७, साकोली १७४ व लाखांदुर तालुक्यातील ३२ व्यक्तीचा समावेश आहे. आतापर्यंत ४३२०४ रुग्णांनी कोरोनावर यशस्वीपणे मात केली आहे. जिल्ह्यात आता कोरोना बाधितांची संख्या ५३१२७ झाली असून ९०१८ क्रियाशील रुग्ण आहेत. आज कोरोनाच्या १५ रुग्णांचा मृत्यू झाला असून

- कोरोना पॉझिटिव्ह ५७३
- बरे झालेले रुग्ण ४३२०४
- एकूण पॉझिटिव्ह रुग्ण ५३१२७
- क्रियाशील रुग्ण ९०१८
- एकूण मृत्यू ९०५
- रिकव्हरी रेट ८१.३२ टक्के
- मृत्यू दर ०१.७०
- आजच्या टेस्ट ३७९९

जिल्ह्यात कोरोना पॉझिटिव्ह मृतांची संख्या एकूण ९०५ झाली आहे.रुग्ण बरे होण्याचे प्रमाण ८१.३२ टक्के आहे. तर जिल्ह्याचा मृत्युदर ०१.७० टक्के एवढा आहे.

शासकीय व खाजगी रुग्णालयात बाह्य रुग्ण विभागात येणाऱ्या कोणत्याही तापाच्या रुग्णांची कोविड चाचणी प्रिस्क्राईब करावी असे निर्देश जिल्हाधिकारी संदीप कदम यांनी दिले आहेत.

**नागरिकांना आवाहन**

- कोवीडपासून बचावासाठी मास्क हा आपला मुख्य संरक्षक आहे, मास्कचा सदैव आणि योग्य वापर करा.
- साबण आणि पाण्याने हात वारंवार कमीत–कमी २० सेकंद व्यवस्थित धुवा.
- साबण आणि पाण्याची सुविधा उपलब्ध नसेल तर अल्कोहोलयुक्त हँड सॅनिटायझरचा वापर करा.

# वाटचाल विकासाची पुस्तिकेचे पालकमंत्र्यांच्या हस्ते प्रकाशन



**भंडारा :–** महाविकास आघाडी सरकारच्या एक वर्षाच्या कार्यकाळात जिल्ह्यात घेण्यात आलेल्या विकास कामांवर आधारित जिल्हा माहिती कार्यालय भंडाराच्या वतीने तयार करण्यात आलेल्या वाटचाल विकासाची महाराष्ट्राच्या यशाचीफ या छायाचित्र पुस्तिकेचे १ मे महाराष्ट्रदिनी पालकमंत्री डॉ. विश्वजीत कदम यांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले.

जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित या कार्यक्रमास खासदार सुनिल मेंढे, आमदार अभिजीत वंजारी, राजू कारेमोरे, जिल्हाधिकारी संदीप कदम, अप्पर पोलीस अधिक्षक अनिकेत भारती, निवासी उपजिल्हाधिकारी शिवराज पडोळे, जिल्हा माहिती अधिकारी रवी गिते, उपनिबंधक मनोज देशकर व अधिकारी उपस्थित होते.

गेल्या वर्षभरात शासनाच्या वतीने आयोजित विविध विकास कामे व महत्वाच्या बैठकांची छायाचित्रे या पुस्तिकेत समाविष्ट आहेत. राज्यपाल भगतसिंह कोश्यारी, मुख्यमंत्री उध्दव बाळासाहेब ठाकरे यांच्या भंडारा येथील गोसेखूर्द व सामान्य रुग्णालय घटना भेटीची छायाचित्रे या पुस्तिकेत आहेत. त्याचप्रमाणे तत्कालीन विधानसभा अध्यक्ष नाना पटोले, पालकमंत्री डॉ. विश्वजीत कदम व विविध मंर्त्यांच्या जिल्हा भेटीतील विकास कामे व दौऱ्याचीही छायाचित्रे यात समाविष्ट आहेत. जिल्हा माहिती कार्यालयाच्या या उपक्रमाचे पालकमंत्र्यांनी कौतूक केले.

# जिल्ह्यात ५८३ रुग्णांची कोरोनावर मात

**गोंदिया :** शासकीय वैद्यकीय महाविद्यालय गोंदिया येथील विषाणू संशोधन व निदान प्रयोगशाळेतून ४ मे रोजी प्राप्त अहवालात जिल्ह्यात नवे ५१३ कोरोना पॉझिटिव्ह रुग्ण आढळून आले. ५८३ कोरोना पॉझिटिव्ह रुग्णांनी औषधोपचारातून कोरोनावर मात केल्याने त्यांना आज सुट्टी देण्यात आली. जिल्ह्यातील कोरोना बाधित ४ रुग्णांचा उपचारादरम्यान मृत्यू झाला.

आजपर्यंत ३४,९१८ रुग्ण कोरोना पॉझिटिव्ह आढळले आहे. २९,४७३ रुग्णांनी आतापर्यंत कोरोनावर मात केली आहे. क्रियाशील असलेल्या जिल्ह्यातील बाधित रुग्णांची संख्या ४८८२ आहे. ३६९९ क्रियाशील असलेले बाधित रुग्ण घरीच अलगीकरणात आहे. आतापर्यंत जिल्ह्यातील ५६३ रुग्णांचा मृत्यू झाला. जिल्ह्यातील कोरोना बाधित रुग्ण आजारातून बरे होण्याचे प्रमाण ८४.४० टक्के आहे. बाधित रुग्णांचा मृत्यू दर १ टक्के आहे तर डब्लिंग रेट २२.५४ दिवस आहे.

जिल्ह्यात ५१३ कोरोना पॉझिटिव्ह रुग्ण आढळले. त्या रुग्णांची संख्या तालुकानिहाय पुढीलप्रमाणे. गोंदिया–१६१, तिरोडा–२८, गोरेगाव–२९,आमगाव–५७, सालेकसा–५२, देवरी–९४, सडक अर्जुनी–५४, अर्जुनी मोरगाव–३० व इतर राज्य/जिल्हा–०८ रुग्ण आढळून आले. जिल्ह्यातील ५८३ रूग्णांनी आज कोरोनावर मात केली. तालुकानिहाय रुग्ण संख्या पुढीलप्रमाणे. गोंदिया–२७३, तिरोडा–६४, गोरेगाव–३७, आमगाव–६६, सालेकसा–१२, देवरी–७३, सडक अर्जुनी–३८, अर्जुनी मोरगाव–१८ व इतर राज्य/जिल्हा–०२ रुग्णांचा समावेश आहे.

गोंदियाच्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील विषाणू संशोधन व निदान प्रयोगशाळेत कोरोना विषाणूच्या तपासणीसाठी आतापर्यंत १३६५४२ नमुने पाठविण्यात आले. यामध्ये १११०३० नमुने निगेटिव्ह आले तर १८०५५ नमुने पॉझिटिव्ह आले. ४१३१ नमुन्यांचा अहवाल प्रलंबीत आहे. रॅपिड अँटीजेन चाचणीतून आतापर्यंत १३९१२३ व्यक्तींचे नमुने घेण्यात आले. यामध्ये ११९६५९ व्यक्तींचे अहवाल निगेटिव्ह आले तर १९४६४ व्यक्तींचे अहवाल पॉझिटिव्ह आढळले. कोरोना वॉर रूममधून बाधित रुग्णांसाठी २४ तास सेवा उपलब्ध आहे. त्या रूग्णांना काही समस्या असल्यास त्यांनी ८३०८८१६६६६ आणि ८३०८८२६६६६ या भ्रमणध्वनीवर संपर्क साधावा.

**गडचिरोली जिल्ह्यात ६२७ कोरोनामुक्त तर १७ मृत्यूसह ५१६ नवीन कोरोना बाधित**

**गडचिरोली:** जिल्हयात ५१६ नवीन कोरोना बाधित आढळून आले. तसेच आज ६२७ जणांनी कोरोनावर मात केल्याने त्यांना रूणालयातून घरी सोडण्यात आले. यामुळे जिल्हयातील आत्तापर्यंत बाधित २३०१२ पैकी कोरोनामुक्त झालेली संख्या १८२८७ वर पोहचली. तसेच सद्या ४२६० सक्रिय कोरोना बाधितांवर उपचार सुरू आहेत. आत्तापर्यंत जिल्हयात एकुण ४६५ जणांचा मृत्यू कोरोनामुळे झाल्याची नोंद आहे. आज १७ नवीन मृत्यूमध्ये ३६ वर्षीय पुरुष रामकृष्णपूर ता.चामोशी, ५१ वर्षीय पुरुष जोगीसाखरा ता.आरमोरी , ६८ वर्षीय महिला गडचिरोली , ३८ वर्षीय पुरुष ता.अहेरी, ५८ वर्षीय पुरुष ता.ब्रम्हपूरी जि.चंद्रपूर , ६१ वर्षीय महिला अहेरी, ६६ वर्षीय महिला वाघाडा बडी ता.आरमोरी, ४० वर्षीय पुरुष उमरी ता.चामोशी , ४८ वर्षीय महिला गडचिरोली, ७५ वर्षीय महिला नवेगाव गडचिरोली, ५५ वर्षीय पुरुष विवेकानंद नगर गडचिरोली, ७३ वर्षीय पुरुष सवीदय वार्ड गडचिरोली, ५३ वर्षीय पुरुष आरमोरी, ७५ वर्षीय पुरुष गडचिरोली,६५ वर्षीय पुरुष वनश्री कॉलोनी नवेगाव गडचिरोली,६५ वर्षीय पुरुष कुरुड ता.वडसा यांचा नवीन मृत्यूमध्ये समावेश आहे. यामूळे जिल्हयातील कोरोना रूण बरे होण्याचे प्रमाण ७९.४७ टक्के, सक्रिय रूणांचे प्रमाण १८.५१ टक्के तर मृत्यू दर २.०२ टक्के झाला.

नवीन ५१६ बाधितांमध्ये गडचिरोली तालुक्यातील १७७, अहेरी तालुक्यातील ५८, आरमोरी ३०, भामरागड तालुक्यातील ७, चामोशी तालुक्यातील ४२, धानोरा तालुक्यातील २६, एटापल्ली तालुक्यातील ३६, कोरची तालुक्यातील ९, कुरखेडा तालुक्यातील बाधितामध्ये ३१, मुल–चेरा तालुक्यातील बाधितामध्ये २२, सिरोंचा तालुक्यातील बाधितामध्ये १९ तर वडसा तालुक्यातील बाधितामध्ये ५९ जणांचा समावेश आहे. तर आज कोरोनामुक्त झालेल्या ६२७ रूणांमध्ये गडचिरोली मधील २२२, अहेरी ६६, आरमोरी ४५, भामरागड १८, चामोशी ६१, धानोरा ०४, एटापल्ली २६, मुल–चेरा १०, सिरोंचा २६, कोरची ३८, कुरखेडा २१, तसेच वडसा येथील ९० जणांचा समावेश आहे.

# राज्याची आरोग्य सुविधा आणखी बळकट करण्यावर भर–मुख्यमंत्री उद्धव ठाकरे

**मुंबई :–** कोविडच्या संकटाने सगळ्यांनाच खूप मोठा धडा दिला आहे. त्यामुळे राज्यातील आरोग्य व्यवस्था आणखी बळकट आणि अशा अनेक संकटांना तोंड देणारी ठरेल, यावर भर दिला जात असल्याचे मुख्यमंत्री श्री. उद्धव ठाकरे यांनी आज येथे सांगितले. पेटीएम फाऊंडेशनच्यावतीने राज्यात ऑक्सिजन निर्मिती प्रकल्प, ऑक्सिजन कॉन्स्ट्रेटर आणि लसीकरणासाठी राज्य शासनाला सहकार्य करण्यात येणार आहे. त्याअनुषंगाने दूरदृश्य प्रणालीद्वारे आयोजित बैठकीत मुख्यमंत्री श्री. ठाकरे बोलत होते.

पेटीएम फाऊंडेशन स्वतःहून पुढे आल्याबद्दल मुख्यंर्त्यांनी अशा संकटाच्या काळात राज्य आणि देशाच्या आर्थिक चक्राला गती देण्यासाठी असे प्रयत्न महत्त्वाचे ठरतील, असे कौतुकोद्गारही काढले. बैठकीस राज्याचे मुख्य सचिव सीताराम कुंटे, मुख्यमंत्र्यांचे अतिरिक्त मुख्य सचिव आशिषकुमार सिंह, आरोग्य विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव डॉ. प्रदीप व्यास, वैद्यकीय शिक्षण संचालक डॉ. तात्याराव लहाने, मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव विकास खारगे, मुख्यमंर्त्यांचे सचिव आबासाहेब जऱ्हाड, वैद्यकीय शिक्षण विभागाचे सचिव सौरभ विजय आणि पेटीएम–फाऊंडेशनचे विजय शेखर–शर्मा, सोनिया धवन, राजेंद्र गुल्हर आदी उपस्थित होते.

मुख्यमंत्री श्री. ठाकरे म्हणाले, विकास होत राहील. पण जीव वाचले, तर विकासाला खरा अर्थ आहे. आपण विकास, म्हणून ज्याच्या मागे धावत होतो. त्या विकासाने आपल्याला तोंड दाखवायला जागा ठेवलेली नाही. आता आपल्याला ऑक्सिजनच्या मागे धावावे लागत आहे. कोरोनाने आपल्याला धडा दिला आहे. त्यामुळे येणाऱ्या काळातील आव्हानांना तोंड देण्याची तयारी आतापासूनच आम्ही सुरु केली आहे. पहिल्या लाटेत आम्ही खूप सुविधा जाणीवपूर्वक वाढवल्या. पण त्याही आता अपू?्या पडू लागल्या आहेत. त्यामुळे आता लसीकरण सुरु झाल्यानंतरही आरोग्य सुविधा वाढविण्यावर भर आहे. आता जुलैनंतर पावसाळ्यामुळेही अनेक साथीचे आजार पसरू लागतात. त्यांना तोंड देण्यासह कोविडची तिसरी, चौथी आणि अशा कितीही लाटा आल्या तरीही त्यांना थोपविण्यासाठी, लोकांना उपचार मिळावेत यासाठी जास्तीत जास्त सुविधा निर्माण करण्यावर भर दिला जाणार असल्याचेही त्यांनी सांगितले. ऑक्सिजन हे आता औषध ठरल्याचे नमूद करून मुख्यमंत्री म्हणाले, राज्यातील ऑक्सिजन निर्मिती पंधराशे मेट्रीक टनांपर्यंत वाढविण्याचे नियोजन आहे. तयाशिवाय ज्या–ज्या गोष्टी आवश्यक आहेत, त्या जास्तीत जास्त प्रमाणात उपलब्ध होतील, असे प्रयत्न आहे. त्यामध्ये तात्पुरत्या आणि दीर्घकाळाचे असे नियोजन आहे. रुग्णशय्यांची संख्या, तसेच कोविड केंद्रांचीही संख्या वाढवणार आहोत.



पेटीएम फाऊंडेशनने ऑक्सिजन निर्मिती, ऑक्सिजन कॉन्स्ट्रेटर आणि लसीकरणात लसीकरणासाठी सरकारी यंत्रणांना सहकार्य करण्यासाठी, लस उपलब्ध करून देण्यासाठी आर्थिक सहाय्याचीही तयारी दर्शवली आहे. या सगळ्या सहकार्याचे आणि पुढाकाराचेही मुख्यमंर्त्यांनी स्वागत केले.

यावेळी झालेल्या चर्चेत मुख्य सचिव श्री. कुंटे यांनी राज्यात ऑक्सीजनच्या उपलब्धतेबाबत आणि स्वयंपूर्णतेसाठी ममिशन ऑक्सिजन स्वावलंबनफ राबविण्यासाठी म्हणून विविध प्रयत्न केले जात असल्याचे सांगितले. यावेळी झालेल्या चर्चेत आरोग्य विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव डॉ. व्यास आर्दींनीही सहभाग घेतला.

**मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांचे प्रयत्न देशासाठी मार्गदर्शक**

पेटीएम फाउंडेशनचे विजय शेखर–शर्मा यांनी मुख्यमंत्री श्री. ठाकरे यांच्या कोविड उपाययोजनांसाठीच्या सातत्यपूर्ण प्र?त्न आणि पुढाकाराचे कौतूक केले. कोविडच्या लाटेला रोखण्यासाठी मास्क वापरासह, लसीकरणाच्या माध्यमातून करण्यात येणाऱ्या उपाययोजनांमध्ये महाराष्ट्राने पुढचे पाऊल टाकले आहे. मुख्यमंत्री श्री. ठाकरे यांच्या दूरदृष्टीकोनातून सुरु असलेले प्रयत्न देशासाठी मार्गदर्शक असल्याचा उल्लेखही त्यांनी केला.

**पेटीएम फाऊंडेशनचा पुढाकार..**

पेटीएम फाऊंडेशनने ऑक्सिजन निर्मिती–पुरवठा, लसीकरण आणि लस उपलब्धतेसाठी निधी यासाठी आवश्यक असे योगदान देण्याची हमी दिली आहे. राज्यात ऑक्सिजन निर्मिती प्रकल्प उभारणीत, तसेच लसीकरणासाठी मुंबई–पुण्यातील मोठ्या कंपन्यांची कार्यालयांचा परिसर आणि मनुष्यबळ उपलब्ध करून देण्याची तयारी. लशीसाठी आवश्यक अर्थसहाय्यही सामाजिक बांधिलकी निधीतून तसेच विविध मार्गातून आर्थिक भार उचलण्याची तयारी दर्शवली आहे.

# पाणी टंचाई निवारणार्थ पंधव्या वित्त आयोगातून निधी द्या

## पाणी पुरवठा योजना कार्यान्वीत करण्याची गरज : खा. प्रफुल्ल पटेल यांचा पत्र दिला

**गोंदिया :** जिल्ह्यातील ग्रामीण भागात उन्हाळ्याच्या सुरुवातीलाच पाणीटंचाईची बिकट समस्या निर्माण झाली आहे. यावर त्वरित उपाययोजना करण्यासाठी निधी उपलब्ध करुन देण्यात यावा. तसेच पाणी पुरवठा योजनेचे बिल थकीत असल्याने अनेक योजनांचा विद्युत पुरवठा खंडित आहे. यासाठी ग्राम पंचायतींना पंधराव्या वित्त आयोगाच्या निधीतून वीज बिल भरण्याची परवानगी देण्यात यावी, यासंदर्भातील खा. प्रफुल्ल पटेल यांचा पत्र दिले.

जिल्ह्यातील अनेक प्रादेशिक पाणी पुरवठा योजना असून यापैकी अनेक योजनांचे हस्तांतरण जिल्हा परिषदेकडे करण्यात आले नाही. त्यामुळे देखभाल दुरुस्ती आणि थकीत वीज बिलामुळे अनेक पाणी पुरवठा योजना बंद आहे. त्यामुळे ग्रामीण भागात पाणीटंचाईची गंभीर समस्या आहे. जि.प. ग्रामीण पाणी पुरवठा विभागाकडे बहुतेक ठिकाणी नळ योजनांचे पाणी उचल करण्याचे स्त्रोत त्यात पाणीच उपलब्ध नाही. त्यामुळे अशा योजनांचे सर्वेक्षण करुन नवीन स्त्रोत उपलब्ध करुन देण्यासाठी विशेष बाब म्हणून लागणारा निधी उपलब्ध करुन देण्यात यावा. अनेक गावात नळ योजना ग्रामपंचायतच्या माध्यमातून चालविण्यात येते. पण वसुल करण्यात येणारी पाणीपट्टीची रक्कम फारच अल्प असल्याने ग्रामपंचायतीसमोर वीज बिल भरण्याचा प्रश्न निर्माण होतो. त्यामुळे ग्रामपंचायतींना शासनाने यासाठी मदत करण्याची गरज आहे. अर्जुनी मोरगांव तालुक्यात चार प्रादेशिक पाणी पुरवठा योजना कार्यान्वित आहेत. चारही योजना सुर असून शिखव समितीच्या माध्यमातून सुरु आहे. पाण्याचे स्त्रोत बळकट असल्याने तालुक्यातील ५० गावांना नियमित पाणी पुरवठा केला जातो. परंतु या योजनेचे बांधकाम १९९७ मध्ये झाले असल्याने या योजनेचे पुर्नजीवन करण्याची आवश्यकता आहे. वार्षिक पाणीपट्टीतून ही योजना चालवितांना तुट निर्माण होत आहे. त्यामुळे शासनाने ही तुट भरण्यासाठी मदत करावी. आदी विविध मागण्यांचे



खा. प्रफुल्ल पटेल यांचे पत्र माजी आ. राजेंद्र जैन, आ. मनोहर चंद्रिकापुरे, जिल्हा नियोजन समितीचे सदस्य गंगाधर परशुरामकर, विनित शहारे यांनी पाणी पुरवठा राज्यमंत्री संजय बनसोडे यांना दिले.

**थकीत ५० टक्के अनुदान त्वरित द्या**

जिल्ह्यातील ग्रामपंचायतींनी पाणी पुरवठा योजनेच्या विद्युत बिलाची रक्कम भरली आहे. यापैकी ५० टक्के अनुदान शासनाकडून ग्रामपंचायतींना दिले जाते. पण मागील चार वर्षांपासून हे अनुदान अद्यापही उपलब्ध करुन देण्यात आले नाही. २०१७ पासून प्रलंबित असलेल्या अनुदानाची रक्कम त्वरित उपलब्ध करुन दिल्यास अनेक पाणी पुरवठा योजना सुरळीत करण्यास मदत होईल.

**जलजीवन योजनेत टोल्यांचाही समावेश करा**

केंद्र सरकारन नवीन जलजीवन पाणी पुरवठा योजनेचा कार्यक्रम जाहीर केला आहे. याची अंमलबजावणी करताना गावा अंतर्गत येणाऱ्या टोल्यांचा समावेश करावा. जिल्ह्यात पाणीटंचाईची समस्या बिकट आहे. जिल्ह्या नियोजन समितीकडून अल्प निधी उपलब्ध असल्याने विशेष बाब म्हणून जिल्हा परिषद ग्रामीण पाणी पुरवठा यांत्रिक विभागास स्वतंत्र निधी उपलब्ध करुन द्यावा.

गोंदिया शहरासाठी ३ कोटी रुपयांचा निधीची गरज

महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभागातंर्गत गोंदिया शहराला पाणी पुरवठा करण्यात येतो. पाणी पुरवठा करणाऱ्या १८ लाख लिटर क्षमतेच्या दोन टाक्या जुन्या झाल्या आहे. त्यामुळे नवीन टाकी तयार करण्यासाठी २ कोटी रुपये आणि जुने जलशुध्दीकरण केंद्र व पंपाची दुरुस्ती करण्यासाठी १ कोटी रुपये असा एकूण ३ कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करुन देण्यात यावा. गोंदिया शहराच्या वाढीव भागात पाणी पुरवठा करण्यासाठी १५ ते २० किमी पाईप लाईन टाकण्यासाठी ४ कोटी, कुडवा व कटंगीकला या गावांमध्ये वाढीव वितरणासाठी पाणी टाकी बांधण्यासाठी जल जीवन मिशन अंतर्गत १० कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करुन देण्यात यावा.

**दोन पाणी पुरवठा योजनांना त्वरित मंजुरी द्या**

नगर पंचायत सडक अर्जुनी व अर्जुनी मोरगाव येथील प्रस्तावित असलेली नवीन पाणी पुरवठा योजना तातडीने मंजूर करण्यात यावी. गोंदिया-भंडारा जिल्ह्यातील पाणी पुरवठा योजनांवर विषेश बैठक आयोजित करण्यात यावी.यात प्रामुख्याने नवीन जल जीवन योजने अंतर्गत येत असलेल्या अडचणीवर चर्चा करावी, ग्रामीण पाणी पुरवठा विभागाला नियमित कार्यकारी अभियंता देण्यात यावा. या वेळी पूर्व आमदार राजेन्द्र जैन, आमदाकिर मनोहर चन्द्रिकापुरे, जिल्हा नियोजन समितीचे सदस्य गंगाधर परशुरामकर, विनीत सहारे उपस्थित होते.

# आरोग्याची काळजी घेत ग्राहकांना अखंडित वीजपुरवठा करावा

**गोंदिया:** कोरोना विषाणूच्या दुसऱ्या लाटेमुळे राज्यात संचारबंदी व वर्क फ्रॉम होम सुरु झाले आहे. त्यातच उन्हाची तीव्रता वाढत असून काही भागात मान्सूनपूर्व वादळी पाऊस होत आहे. या पार्श्वभूमिवर महावितरणचे अभियंते व कर्मचाऱ्यांनी कोरोनाचा संसर्ग टाळण्यासाठी सर्व प्रकारची काळजी घेत सुरळीत वीजपुरवठ्यासाठी सज्ज राहावे, अशी सूचना महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. विजय सिंघल यांनी केली आहे.

कोरोना विषाणूच्या दुसऱ्या लाटेमुळे प्रामुख्याने कोविड व इतर सर्व रुग्णालये, ऑक्सिजन निर्मिती व रिफिलींग उद्योगांसह सर्व ग्राहकांचा वीजपुरवठा सुरळीत ठेवण्यात यावा. सध्या संचारबंदी व कार्यालयीन उपस्थितीच्या निर्बंधांमुळे खासगी व शासकीय कर्मचा?यांचे वर्क फ्रॉम होम सुरू आहे. त्यातच उन्हाची तिव्रता वाढत असल्याने विजेची मागणीही वाढत आहे. राज्यात वाढत्या मागणीप्रमाणे वीजपुरवठा करण्यास महावितरण सक्षम आहे. मात्र मान्सूनपूर्व वादळी पावसाला राज्याच्या काही भागात सुरवात झाली आहे. अशा परिस्थितीत सुरळीत व अखंडित वीजपुरवठ्यासाठी युद्धपातळीवर सज्ज राहावे, अशी सूचना महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. विजय सिंघल यांनी केली आहे. वादळी पाऊस किंवा अन्य कारणांनी वीजपुरवठा खंडित झाल्यास युद्धपातळीवरील दुरुस्ती कामांद्वारे किंवा पर्यायी व्यवस्थेतून वीजपुरवठा सुरु करण्याची कार्यवाही करावी. सोबतच वीजयंत्रणेच्या मान्सूनपूर्व देखभाल व दुरुस्तीची कामे वेगाने करावीत, असे निर्देशही त्यांनी दिले आहे.

सध्याची कोरोना लाट महावितरणकरिता अतिशय कसोटीची आहे. महावितरणचे अभियंते व कर्मचाऱ्यांनी ग्राहकांना सेवा देतांना कोरोनाचा संसर्ग टाळण्यासाठी सर्व प्रकारची काळजी घ्यावी. कोविडबाधित कर्मचारी व कुटुंबियांना सर्व प्रकारची आवश्यक वैद्यकीय व आर्थिक मदत मिळवून देण्यासाठी परिमंडलस्तरावरील समन्वय कक्षांमार्फत कामे सुरु आहेत. नियमित व कंत्राटी सर्व कर्मचाऱ्यांचे लसीकरण लवकरात लवकर पूर्ण करावे. वीजपुरवठा सुरळीत ठेवण्याचे कर्तव्य बजावत असताना कर्मचाऱ्यांनी कोरोनाच्या वाढत्या संसर्गामध्ये प्रतिबंधात्मक उपायांकडे कोणतेही दुर्लक्ष करू नये. आरोग्याची गंभीरपणे काळजी घ्यावी.

थोडीही लक्षणे दिसल्यावर ताबडतोब कोरोना चाचणी करून घ्यावी. सर्व कर्मचाऱ्यांनी स्वत: सोबतच आपल्या सहकाऱ्यांची व कुटूंबियांच्या आरोग्याची विशेष काळजी घ्यावी, असे आवाहन महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. विजय सिंघल यांनी केले आहे.

# महाराष्ट्र दिनानिमीत्त राज्यमंत्री संजय बनसोडे यांच्या हस्ते जिल्हाधिकारी कार्यालयात ध्वजारोहण

**गोंदिया :** महाराष्ट्र राज्याच्या ६१ व्या वर्धापन दिनानिमीत्त पाणी पुरवठा व स्वच्छता राज्यमंत्री संजय बनसोडे यांच्या हस्ते जिल्हाधिकारी कार्यालयात ध्वजारोहण करुन महाराष्ट्र दिन साधेपणाने साजरा करण्यात आला.



या ध्वजारोहण समारंभाला जिल्हाधिकारी दीपक कुमार मीना, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रदिपकुमार डांगे, पोलीस अधीक्षक विश्व पानसरे, अपर जिल्हाधिकारी राजेश खवले, निवासी उपजिल्हाधिकारी जयराम देशपांडे, उपजिल्हाधिकारी (निवडणूक) सुभाष चौधरी, उपजिल्हाधिकारी (रोहयो) सचिन गोसावी, जिल्हा पुरवठा अधिकारी देवराम वानखेडे, नगरपरिषदेचे मुख्याधिकारी करण चव्हाण, उपविभागीय अधिकारी वंदना सवरंगपते, तहसिलदार आदेश डफळ, अपर तहसिलदार अनिल खडतकर उपस्थित होते.

कोरोनाच्या पार्श्वभूमीवर अतिशय काटेकोरपणे सामाजिक अंतरचे पालन करुन आणि साधेपणाने करण्याचा निर्णय शासनाने घेतला. त्यानुसार जिल्हाधिकारी कार्यालयात हा ध्वजारोहण कार्यक्रम साधेपणाने साजरा करण्यात आला.

# कोरोणा नियंत्रणासाठी सामुहिक प्रयत्नाची गरज खा.सुनिल मेंढे

**अर्जूनी-मोरगाव:** -सध्या आपल्याला फक्त एकच लढाई लढायची आहे ती म्हणजे कोरोणाची. कोरोणाचा शिरकाव आता ग्रामीण भागातही जोर पकडत आहे.कोरोणावर नियंत्रण मिळविण्यासाठी आता सामुहिक प्रयत्नाची गरज असल्याचे आवाहन भंडारा-गोंदिया लोकसभा क्षेत्राचे खासदार सुनिल मेंढे यांनी केले आहे.

ते अर्जुनीमोर येथील उपविभागीय अधिकारी कार्यालयात मंगळवारी (दि. ४) घेण्यात आलेल्या कोरोणा विषयावर आढावा बैठकीत बोलत होते. यावेळी उपविभागीय अधिकारी शिल्पा सोनाले, तहसीलदार विनोद मेश्राम,नगरपंचायत मुख्याधिकारी शिल्पाराणी जाधव,ठाणेदार महादेव तोदले, ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. अरविंद अकिनवार, तालुका वैद्यकीय अधिकारी डॉ.विजय राऊत,गटविकास अधिकारी राठोड, गटशिक्षणाधिकारी मांढरे, नवेगांवबांध ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकिय अधिकारी,तालुका भाजप अध्यक्ष अरविंद शिवणकर, जिल्हा महासचिव लायकराम भेंडारकर,भंडारा किसान आघाडीचे अविनाश ब्राम्हणकर, रघुनाथ लांजेवार, डॉ. गजानन डोंगरवार, माजी जिप सभापती प्रकाश गहाणे, विजय कापगते,गिरीष बागडे,संदिप कापगते,व आरोग्य विभागाचे कर्मचारी उपस्थित होते.



यावेळी संबधित अधिकारी यांनी कोरोणा संदर्भात आपापल्या विभागाचा आढावा सादर केला.यावेळी तालुका वैद्यकीय अधिकारी डॉ.विजय राऊत यांनी सांगितले की, तालुक्यात २ दोन ३७२ पाझिटिव्ह रुग्ण असून ॲक्टीव रुग्ण २६३ आहेत. गृहविलगीकरणात ४५१ रुग्ण आरोग्य विभागाचे देखरेखेत उपचार घेत आहेत. काही रुग्ण इतरत्र उपचार घेत आहेत. कोविड केअर सेंटर मधे चार पुरुष व दोन महिला रुग्ण भर्ती असल्याचे सांगितले. तालुक्यात ४५ते ६५ वयोगटावरील ५० हजार ३३५ नागरिक असून २२ हजार ५८२ लोकांना लस देण्यात आली आहे. तर २५ हजार ५५० लोकांची कोरोणा चाचणी करण्यात आली आहे. सध्या १८ ते ४५ वयोगटावरील नागरीकांना लस देणे सुरु झाले आहे.तालुक्यात कोरोणाचा प्रादुर्भाव होत असला तरी परिस्थिती नियंत्रणात असल्याचे सांगण्यात आले आहे.

खा.मेंढे यांनी कोरोणा नियोजनाबाबत जिल्हास्तरावरील वरिष्ठ अधिकारी यांचेशी भ्रमणध्वनी द्वारे संवाद साधून अर्जुनी मोर तालुक्यात कोरोना नियंत्रणाविषयी आरोग्य सामुग्री त्वरित पोहोचती करण्याच्या सूचना दिल्या. नागरिकांनी विनाकारण घराबाहेर निघू नये, सतत मास्क चा वापर करावा, कुठलिही गर्दी करु नये, कोरोणा चाचणी व लस घेण्यासाठी तत्परतेने पुढे यावे असे आवाहन ही खा.सुनिल मेंढे यांनी केले.

**कोविड केंद्राला तिन ऑक्सीजन कॉन्सट्रेटर्स,व दोन बॉयपॅक मशीन भेट**

कोरोणाचा प्रादुर्भाव थांबवण्यासाठी व जनतेला आरोग्य सुविधा त्वरीत उपलब्ध व्हावी, यासाठी राज्याचे माजी सामाजिक न्याय व विशेष सहाय्य मंत्री राजकुमार बडोले यांचे प्रयत्नाने तीन ऑक्सीजन कॉन्सट्रेटर्स उपलब्ध करुन दिले. खासदार सुनिल मेंढे यांनी तीन बॉयपॅक मशीन उपलब्ध करून दिली.

# भाजपने पंढरपूर जिंकले

**सोलापूर :** महाविकास आघाडी सरकारमधील काँग्रेस, राष्ट्रवादी आणि शिवसेना या तीन दिग्गज पक्षांना पराभूत करत भाजपने पंढरपूर-मंगळवेढा विधानसभा पोटनिवडणुकीत विजय मिळवला. भाजपच्या समाधान आवताडे यांनी राष्ट्रवादीचे उमेदवार भगीरथ भालके यांचा अटीतटीच्या लढतीत ३५०३ मतांनी पराभव केला.

दुरंगी लढतीत राष्ट्रवादीच्या सत्तेला भाजपने चांगलाच सुरुंग लावला आहे. समाधान आवताडे यांना १ लाख ७ हजार ७७४, तर भगीरथ भालके यांना १ लाख ४ हजार २७१ मते मिळाली. या निवडणुकीत १९ पैकी १७ उमेदवारांचे डिपॉझिट जप्त झाले आहे. सकाळी मतदानाला सुरुवात झाल्यानंतर सात फेऱ्यांपर्यंत राष्ट्रवादीचे भालके आघाडीवर होते. मात्र त्यानंतर भाजपचे उमेदवार समाधान आवताडे यांनी आपली अगदी शेवटपर्यंत म्हणजेच ३८ व्या फेरीपर्यंत आघाडी कायम ठेवली.

विधान परिषदेचे आमदार प्रशांत परिचारक यांची ताकद लागल्यामुळे समाधान आवताडे यांचा विजय सोपा झाला. आमदार भारत भालके यांच्या निधनामुळे रिक्त झालेल्या पोटनिवडणुकीसाठी राष्ट्रवादीने कंबर कसली होती. या निवडणुकीसाठी ६५.७३ टक्के मतदारांनी मतदानाचा हक्क बजावताना २ लाख २४ हजार ६८ मतदारांनी मतदान केले होते. १९ उमेदवार असल्याने मतांची विभागणी होऊन राष्ट्रवादीचा उमेदवार निवडून येईल, असे महाविकास आघाडीतील नेत्यांना वाटत होते. मात्र १९पैकी १७ उमेदवारांना नगण्य मते मिळाल्यामुळे तसेच आवताडे यांना स्वतःच्या मंगळवेढा तालुक्यातील व पंढरपुरातून खुद्द आमदार प्रशांत परिचारक यांची मोठी मदत मिळाली. माळशिरसचे खासदार रणजितसिंह नाईक-निंबाळकर हे समाधान आवताडे यांचे प्रचारप्रमुख होते. आमदार भारत भालके यांनी तीनवेळा वेगवेगळ्या पक्षाकडून निवडणूक लढवून हॅटट्रिक साधली होती. मात्र, त्यांच्यानंतरच्या सहानुभूतीच्या लाटेला मतदारांनी नाकारले.

**आघाडी सरकारसाठी धोक्याचा इशारा, पंढरपूर पोटनिवडणूक निकालावर नितेश राणेंचे अचूक भाष्य**

पंढरपूर पोटनिवडणुकीच्या निकालावरून आमदार नितेश राणे यांनी महाविकास आघाडी सरकारवर निशाणा साधला आहे. पंढरपूर पोटनिवडणुकीमध्ये महाविकास आघाडीचे मंत्री आणि उपमुख्यमंत्रीपर्यंत सगळे गल्लो गल्ली फिरले. तरीही लोकांनी नाकारले. महाविकास आघाडीमधील आमदारांसाठी हा संदेश आहे. येणारा धोका समजा आणि एक पाऊल पुढे टाका. भाजप हा एकच पर्याय आहे. महाराष्ट्राची जनता आमच्याबरोबर आहे, असे ट्विट नितेश राणे यांनी केले आहे.

**अन्यथा महागात पडेल, चंद्रकांत पाटलांचा भुजबळांना इशारा**

पाच राज्यांच्या निवडणुकीसह पंढरपूर पोटनिवडणुकीच्या निकालांवरील प्रतिक्रियेनंतर भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रकांत पाटील यांनी मंत्री छगन भुजबळांना इशारा दिला आहे. छगन भुजबळांनी पंढरपूरवर प्रतिक्रिया द्यावी, जामिनावर सुटलेला आहात, तुम्ही निर्दोष सुटलेले नाहीत. त्यामुळं तुम्ही फार जोरात बोलू नका अन्यथा फार महागात पडेल. बोलायचं असेल पंढरपूर, आसाम, पुद्दुचेरीवर बोला, असं ते म्हणाले. भुजबळांनी बंगालच्या निकालावरून भाजपवर टीका केली होती.

## महाराष्ट्रात कोरोना रुग्ण संख्येत घट

मुंबई : राज्यात काल ५६ हजार ६४७ नवीन रुग्णांचे निदान झाले, तर ६६९ कोरोनाबाधितांचा मृत्यू झाला आहे. राज्याच्या आरोग्य विभागान ही माहिती दिली आहे.

गेल्या काही दिवसांपासून राज्यातील रुग्णसंख्या आटोक्यात येत असल्याचं चित्र आहे. राज्यातील शनिवारच्या तुलनेत नवी रुग्णसंख्येत कमालीची घट दिसत आहे. तसंच, करोनाबाधित मृतांचा आकडाही नियंत्रणात आला असल्याचं चित्र आहे.

काल राज्यात ५६ हजार ६४७ कोरोनाबाधित रुग्ण सापडले आहेत. तर, आज दिवसभरात ५१ हजार ३५६ रुग्ण बरे होऊन घरी परतले आहेत. त्यामुळं आजपर्यंत एकूण ३९ लाख ८१ हजार ६५८ जणांनी कोरोनावर यशस्वी मात केली आहे. त्यामुळं राज्यातील रुग्ण बरे होण्याचे प्रमाण ८४. ३१ टक्के इतके झाले आहे.

गेल्या २४ तासांत ६६९ रुग्णांचा कोरोनामुळं मृत्यू झाला आहे. त्यामुळं सध्या राज्यातील मृत्यूदर १.४९ टक्के इतका झाला आहे. राज्यात आजपर्यंत एकूण ७० हजार २८४ रुग्णांचे कोरोनामुळं प्राण दगावले आहेत.

महाराष्ट्रात सध्या ६ लाख ६८ हजार ३५३ इतके ॲक्टिव्ह रुग्ण आहेत. आजपर्यंत तपासण्यात आलेल्या २,७६,५२,७५ चाचण्यांपैकी ४७ लाख २२ हजार ४०१ चाचण्या पॉझिटिव्ह आल्या आहेत, तर राज्यात सध्या ३९ लाख ९६ हजार ९४६ व्यक्ती होम क्वारंटाइनमध्ये आहेत, तर २७ हजार ७३५ व्यक्ती संस्थात्मक क्वारंटाइनमध्ये आहेत.

# जमिनीच्या वैमनस्यातून पाटलाने पाडले गरिबांचे शौचालय

**तिरोडा :** हक्काची जागा. त्यावर सुरू केले बांधकाम. मात्र हे बांधकाम पाटलाच्या घरासमोर होत असल्याने त्याने त्यात अडथळा निर्माण केला. तसेच स्वजागेवर बांधकाम करणाऱ्या इसमाच्या पुतण्याच्या घरचे शौचालय व स्नानगृह घरी पुरुष मंडळी नसताना पाटलाने जेसीबीने पाडून त्या गरिबाचे तब्बल दीड लाख रुपयांचे नुकसान केले. हा प्रकार २८ एप्रिल रोजी ग्राम मेंढा येथे घडला.




सविस्तर असे की, हरिराम सूर्यवंशी यांच्या मालकीची खुली जागा हेमंत छोटेलाल टेंभरे यांच्या घरासमोर आहे. मालक हरिराम सूर्यवंशी यांनी आपल्या ९ बाय १२ या क्षेत्रफळावर स्वतःचे बांधकाम करण्याचे कार्य सुरू केले. तेव्हा बांधकामागील असलेले टेंभरे यांनी या बांधकामात अडथळा निर्माण केला. यावर हरिराम यांनी याची तक्रार महात्मा गांधी तंटामुक्त गाव समितीचे अध्यक्ष, सचिव, पोलीस पाटील आणि सरपंच यांना केली.

सदर जागेचा वाद यापूर्वी निकाली लागला होता. तसे दस्तावेज म्हणून शंभर रुपयाच्या स्टँप पेपरवर आपणासमक्ष लिहिले असून पंच देखील आपणच आहात, अशी विनंती घेऊन गेले होते. पण आता पुन्हा अडचण आली आहे. यावर पदाधिकाऱ्यांनी दोन दिवस आपण थांबा. आपण प्रकरण बघू, असा सल्ला दिला होता.

हरिराम सूर्यवंशी आणि हेमंत टेंभरे हे लगतचे शेजारी असून टेंभरे यांचे शेत व वाडी लगतच आहे. तुम्ही माझ्या शेतात अतिक्रमण केले, माझी शेतजमीन बळकावली, या मनोदयातून हेमंत टेंभरे याने हरिराम सूर्यवंशी यांच्या पुतण्या भोजराज सूर्यवंशी यांच्या मालकीचे शौचालय व स्नानगृह जमीनदोस्त करून गरीब मोलमजुरी करून, हातावर पोट भरणा?या भोजराजचे मोठे नुकसान केले. जेव्हा की हरिराम विरुद्ध हेमंत यांच्या वादात भोजराजचा कोणताही संबंध नाही.

पण हेमंत टेंभरे याने आपल्या पाटीलकीचा तोरा दाखवून सूर्यवंशी परिवारातील सदस्यांना त्रास देण्याचे हेतूने भोजराजचे शौचालय व स्नानगृह जेसीबीद्वारे भोजराज घरात नसताना जमीनदोस्त केले. ही घटना २८ एप्रिल २०२१ रोजी घडविण्यात आली.

याबाबतची तक्रार पोलीस ठाणे तिरोडा, ग्रामपंचायत मेंढा, महात्मा गांधी तंटामुक्त गाव समिती, आरोग्याचे दृष्टीने प्राथमिक आरोग्य केंद्र, आरोग्य विभाग पंचायत समिती तिरोडा, खंडविकास अधिकारी तिरोडा आणि तहसीलदार यांना तक्रार देण्यात आल्या आहेत.



# पाणी टंचाई भासणार नाही असे नियोजन करा-राज्यमंत्री संजय बनसोडे



**गोंदिया :** उन्हाळ्याचे दिवस असल्यामुळे जिल्ह्यात पाणी टंचाई भासत आहे. त्यामुळे पाणी टंचाई भासणार नाही असे नियोजन करुन पाण्याचे स्त्रोत असलेल्या ठिकाणाहून पाणी उपलब्ध करुन पाणी टंचाईवर मात करावे. असे निर्देश पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाचे राज्यमंत्री संजय बनसोडे यांनी संबंधित यंत्रणेला दिले.

१ मे रोजी जिल्हाधिकारी कार्यालयातील जिल्हा नियोजन समितीच्या सभागृहात पाणी पुरवठा बाबत आढावा घेण्यात आला, त्यावेळी ते बोलत होते. सभेला आमदार विनोद अग्रवाल, आमदार मनोहर चंद्रिकापुरे, माजी आमदार राजेंद्र जैन, जिल्हाधिकारी दीपक कुमार मीना, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रदिपकुमार डांगे यांची प्रामुख्याने उपस्थिती होती.

राज्यमंत्री श्री बनसोडे पुढे म्हणाले, पाणी पुरवठ्या बाबतची अपूर्ण असलेली कामे येणाऱ्या ३१ मार्चपर्यंत ७० टक्के पूर्ण झाली पाहिजेत. पांदन रस्त्यांच्या कामासाठी जेवढा निधी लागेल तेवढा निधी उपलब्ध करुन देणार, त्यासाठी मागणी प्रस्ताव सादर करावा. जल जीवन मिशन बाबत वेळोवेळी बैठका घेण्यात याव्या असे त्यांनी सांगितले.

आमदार विनोद अग्रवाल म्हणाले, शहराच्या पाणी टंचाईसाठी डांगोली बॅरेज बांधणे गरजेचे आहे. लोकांना पाणी मिळाले पाहिजे असे त्यांनी यावेळी सांगितले. माजी आमदार राजेंद्र जैन यांनी गोंदिया शहराला सकाळ व संध्याकाळ किती पाणी पुरवठा करण्यात येतो याबाबत विचारणा करुन नाराजी व्यक्त केली.

पाणी टंचाई निवारण कार्यक्रमांतर्गत गोंदिया जिल्ह्यातील सन २०२०-२१ अंतर्गत पाणी टंचाई आराखडा टप्पा १ निरंक असून टप्पा २ अंतर्गत एकूण १०१ उपाययोजनांचे ५६.६४ लक्ष रुपयाच्या आराखड्यास मंजूरी प्राप्त झालेली आहे. तसेच टप्पा ३ अंतर्गत एकूण १६४७ उपाययोजनांचे ५८९.१० लक्ष रुपये आराखड्या मंजूरी प्राप्त झालेली आहे. दोन्ही आराखड्यांचे एकूण १७४८ उपाय योजनांसाठी ६४५.७४ लक्ष रुपये मंजूरी प्राप्त आहे. त्यापैकी नविन विंधन विहिर घेणे- २८ कामे, नळ योजनेची विशेष दुरुस्तीची ८ कामे तसेच सार्वजनिक विहीर खोलीकरण व गाळ काढणे व इनवेल बोअर करणेच्या ४६ कामांना प्रशासकीय मंजूरी प्राप्त झाली आहे. प्रशासकीय मान्यता प्राप्त कामांपैकी नविन विंधन विहीर घेण्याचे काम प्रगतीपथावर आहे.

जल जीवन मिशन कार्यक्रमांतर्गत गोंदिया जिल्ह्यात सन २०२०-२१ मध्ये जल जीवन मिशन अंतर्गत घरगुती नळ जोडणी एकूण ५४५ ग्रामपंचायतीमध्ये ८६७ गावे १६०० वाड्या यामधील एकूण कुटूंब संख्या २५१८६७ पैकी सन २०२०-२१ अंतर्गत नळ जोडणी व खाजगी स्त्रोत मिळून १६१४९८ उद्दिष्ट पूर्ण करण्यात आले आहेत. अशी माहिती बैठकीत देण्यात आली.

सभेला अपर जिल्हाधिकारी राजेश खवले, निवासी उपजिल्हाधिकारी जयराम देशपांडे, उपजिल्हाधिकारी (रोहयो) सचिन गोसावी, जि.प.उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य) नरेश भांडारकर, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणचे मुख्य अभियंता सतीश चंद्रसुशिल, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणचे कार्यकारी अभियंता रत्नाकर चंद्रिकापुरे उपस्थित होते.

# लिक्विड मेडीकल ऑक्सिजन प्लांटचे काम प्रगतीपथावर



**गोंदिया :** कोविड १९ च्या रुग्णांना उपचाराच्या दृष्टीने अदानी फाऊंडेशन तिरोडा मार्फत सीएसआर निधी अंतर्गत लिक्विड मेडीकल ऑक्सिजन १३ KL क्षमतेचा प्लांट कुवर तिलकसिंह सामान्य रुग्णालय आवारात प्रस्थापित करण्याचे काम प्रगतीपथावर आहे. सदर प्लांटच्या कामाची पाहणी जिल्हाधिकारी दीपक कुमार मीना, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रदिपकुमार डांगे, अप्पर जिल्हाधिकारी राजेश खवले, उपजिल्हाधिकारी सुभाष चौधरी यांनी केली व कामाबद्दल समाधान व्यक्त केले.

यावेळी नगर परिषदेचे मुख्याधिकारी करण चौव्हाण, एफडीएचे वरिष्ठ अधिकारी संदीप नरवने, अदानी फाऊंडेशनचे नितीन शिराळकर तसेच वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ.नरेश तिरपुडे, प्रशासकीय अधिकारी संजय भोंडे, श्री. कटरे, परेश बोरसे, शिवम घारड मोनिका बायोमेडीकलचे इंजि. उपस्थित होते. लिक्विड ऑक्सिजन प्लांट येत्या ४ ते ५ दिवसात कार्यान्वित होईल. तसेच व्हिआरडीएल प्रयोगशाळा, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय गोंदिया करीता ऑटोमॅटिक आरएनए ऐक्सट्राकशन मशिन एक नग प्राप्त झाली आहे.

येत्या ३ दिवसात सदर मशिन कार्यान्वित होईल व त्यामुळे दैनदिन आरटीपीसीआर कोविड चाचणीची संख्या वाढेल असे वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ.नरेश तिरपुडे यांनी प्रसिध्दी पत्रकाव्दारे कळविले आहे.

# जिल्हा बँकेला १६४ कोटी पीककर्ज वाटपाचे उद्दिष्ट

## खरीप हंगामात शेतकऱ्यांना मिळणार आर्थिक बळ



**गोंदिया:** शेती हंगामात शेतकऱ्यांना बि-बियाणे, कीटकनाशके, खते, कृषी साहित्य खरेदी करता यावे, यासाठी दरवर्षी शासनाकडून जिल्हा बँका, राष्ट्रीयकृत व खासगी बँकांकडून पीक कर्ज उपलब्ध करून देण्यात येते. येत्या खरीप हंगामासाठी गोंदिया जिल्हा मध्यवती सहकारी बँकेला १६४ कोटी रुपये पीक कर्ज वाटपाचे उद्दिष्ट आहे. जिल्हा बँकेच्या विविध शाखांमार्फत शेतकऱ्यांना पीक कर्ज वाटपाची प्रक्रिया सुरू झाली आहे. यामुळे जिल्ह्यातील शेतकऱ्यांना आर्थिक बळ मिळणार आहे. यावर्षी काही अडचणीमुळे पीककर्ज वाटपास उशीर झाला असला तरी ३ मे पासून नियमित असल्याची माहिती जिल्हा बँकेचे अध्यक्ष माजी आमदार राजेंद्र जैन यांनी दिली.

जिल्ह्यात खरीप हंगामात सुमारे १ लाख ९० हजार क्षेत्रात धानाची लागवड करण्यात येते. रब्बीचा हंगाम संपल्यानंतर शेतकरी खरीप पुढील हंगामाचे नियोजन करतात. गुडीपाडव्यानंतर शेत मशागतीची कामे शेतकरी सुरू करतात. शेती कसण्यासाठी शेतकऱ्यांना भांडवलाची गरज असते. शासन शेतकऱ्यांना बि-बियाणे, खते, कृषी साहित्य खरेदीसाठी राष्ट्रीयकृत बँका, ग्रामीण बँका, खासगी व जिल्हा सहकारी बँकांच्या माध्यमातून पीक कर्ज उपलब्ध करून देण्यात येते. हे पीक कर्ज अल्प, मध्यम व दीर्घ मुदतीचे असते. १ लाखपेक्षा कमी रकमेचे अल्प मुदतीचे पीक कर्ज बिनव्याजी असते. मध्यम मुदतीच्या पीक कर्जावर ४ ते ६ व दीर्घ मुदतीच्या पीककर्जावर ८ ते ११ टक्के व्याज बँकांकडून घेतले जाते. शेतकऱ्यांची बँक म्हणून संबोधल्या जाणाऱ्या जिल्हा सहकारी बँकेच्या विविध शाखांमार्फत दर हंगामात जिल्ह्यातील ६५ हजार पेक्षा अधिक शेतकऱ्यांना कर्जाचे वाटप केले जाते. मार्च अखेरपर्यंत पुर्वीच्या कर्जाची परतफेड केल्यानंतरच पुढील हंगामासाठी पीक कर्ज दिले जाते. विशेष म्हणजे, बँकांकडून दरवर्षी एप्रिल महिण्यात शेतकऱ्यांना पीक कर्ज वाटपाला सुरुवात करण्यात येते. यावर्षी मात्र कर्जवाटप प्रक्रियेला महिनाभर उशीर झाला आहे. शेतकऱ्यांच्या हिताची बँक म्हणून जिल्हा सहकारी बँकेकडे पाहिले जाते. विशेषतः दरवर्षी या बँकेकडून सर्वाधिक पीक कर्जाचे वाटप करण्यात येत असल्याने शेतकऱ्यांचा कल या बँकेकडे अधिक असल्याचे पहावयास मिळते. यंदाही शेतकऱ्यांना पीक कर्ज वाटपासाठी बँक सज्ज झाली असून ३ मेपासून कर्ज वाटपाला सुरुवातही करण्यात आली आहे. १६४ कोटी रुपयांचे कर्ज वाटपाचे उद्दिष्ट बँकेकडून ठेवण्यात आले आहे. बँकेकडून मिळणाऱ्या पीक कर्जाचे बळ बळीराजासाठी नवसंजीवनी ठरणार आहे.

जिल्हा बँकेकडून नेहमी शेतकऱ्यांच्या हिताला प्राधान्य दिले जाते. दरवर्षी एप्रिल महिण्यात कर्जवाटपाला सुरुवात केली जाते. मात्र यावर्षी त्यात उशीर झाला आहे. ३ मेपासून कर्जवाटप प्रक्रियेला सुरवात झाली असल्याचे जिल्हा मध्यवती सहकारी बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी सुरेश टेटे यांनी सांगीतले.

# लातूर जिल्ह्यात आयुषच्या डॉक्टरांना घेऊन कोविड केअर सेंटर सुरु करणार-वैद्यकीय शिक्षण मंत्री अमित देशमुख

**मुंबई :** देशभरासह राज्यात कोविड विषाणूच्या दुसऱ्या लाटेत रुग्णसंख्या दिवसागणिक वाढताना दिसत आहे. कोविड रुग्णांवर उपचार करण्यासाठी आज ॲलोपॅथीचा प्रामुख्याने उपयोग करण्यात येत आहे. पण येत्या काळात लातूर जिल्ह्यात आयुषच्या सर्व डॉक्टरांना एकत्र करून पहिले कोविड केअर सेंटर सुरु करण्याचा प्रयत्न करणार असल्याचे वैद्यकीय शिक्षण मंत्री अमित देशमुख सांगितले. आयुष टास्कफोर्सचे सदस्य यांच्या समवेत श्री. देशमुख यांनी ऑनलाईन पद्धतीने संवाद साधला.

मंत्री श्री. देशमुख म्हणाले की, गेल्या जवळपास वर्षभरापासून अधिक काळ कोविड संकटाशी आपण सामना करत असून अजूनही रुग्णसंख्या आटोक्यात आलेली नाही. यामुळेच कोविड केअर सेंटरमध्ये आयुष अंतर्गत येणा?्या पॅथीचा उपयोग रुग्णांसाठी करून एक पायलट सेंटर लातूरमध्ये सुरु करण्याचा प्रयत्न आहे. सध्याच्या काळात कोविड रुग्णांची संख्या तातडीने कमी करणे आवश्यक आहे. कोविडची सौम्य लक्षणे असणाऱ्यांना आयुर्वेद, होमिओपॅथी, युनानीमार्फत उपचार देता येऊ शकतात. त्यासाठी एस.ओ.पी.तयार करण्याचे काम आयुष संचालनायामार्फत करण्यात यावे. जेणेकरून राज्यात आयुष संचालनायाअंतर्गत येणाऱ्या डॉक्टरांना या एस.ओ. पी.अंतर्गत कोविड रुग्णांवर उपचार करता येऊ शकतील. आयुर्वेद आणि उपचार पद्धतींचा उपयोग कोविड रुग्णांच्या उपचारासाठी होऊ शकतो. त्यामुळे ही एस.ओ.पी. वैद्यकीय शिक्षण संचालक आणि आयुष संचालक यांनी तयार करावी.

सध्या दिल्ली आणि जयपूरमध्ये कोविडसाठी आयुर्वेद उपचाराला मान्यता देण्यात आली असल्याने हाच पॅटर्न महाराष्ट्रातही राबविण्यासाठी येत्या काळात प्रयत्न करण्यात येईल. यामुळे आयुष डॉक्टरांचे मोठे संख्याबळ उपलब्ध होणार आहे. आयुष अंतर्गत येणाऱ्या पॅथींना उपचारांसाठी परवानगी द्यावी, असे केंद्र शासनाकडे पत्र आयुष संचालनायामार्फत देण्यात येईल, असेही श्री देशमुख यांनी सांगितले. येणाऱ्या काळात लातूरमध्ये प्रामुख्याने इंटिग्रेटेड आयुष क्लिनिक सुरु करण्याबाबत विचार असून याबाबतच्या अंमलबजावणीसाठी आयुष संचालयानाने पुढाकार घ्यावा.

श्री. देशमुख म्हणाले की, कोविडसाठी उपचार पद्धती निरनिराळ्या असून ॲलोपॅथी यामध्ये प्रमुख भूमिका निभावत असली तरी अल्टरनेटीव्ह थेरपी निरनिराळ्या असू शकतात. आयुष संचालनायांतर्गत येणाऱ्या वेगवेगळ्या पॅथीच्या डॉक्टरांनी या क्षेत्रात काम आणि संशोधन केलेले आहे. त्यामुळे आपल्या संशोधनाच्या कामाचा, ज्ञानाचा उपयोग या काळात करून घेण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे. येत्या काळात होमिओपॅथिक आयुर्वेदिक, औषधे यांना मान्यता देताना त्यांनी मानके परिपूर्ण केली आहेत का हे तपासून घेणे आवश्यक आहे.

वैद्यकीय शिक्षण मंत्री अमित देशमुख यांनी आज आयुष टास्क फोर्स सदस्यांसोबत झूम मीटिंगद्वारे चर्चा केली. आजच्या बैठकीत वैद्यकीय शिक्षण संचालक डॉ. तात्याराव लहाने, आयुष संचालक डॉ. कुलदीप राज कोहली, डॉ. झुबैर शेख, डॉ. मनीष पाटील, डॉ. जवाहर शाह, डॉ. शुभा राऊळ, डॉ. उर्मिला पिटकर, डॉ. उदय कुलकणी, डॉ. मनोज राजा, डॉ. जसवंत पाटील, डॉ. राजश्री कटके, डॉ. संजय लोंढे, डॉ. अमित दवे, डॉ. राजेंद्र निरगुडे, डॉ. नवीन पावस्कर, डॉ. पुरुषोत्तम लोहिया, डॉ. हरीश बी सिंग, जयंत वकनाली आदी उपस्थित होते.

# भंडारा सामान्य रुग्णालय येथे व्हेंटिलेटर भेट



**भंडारा :** कोरोना काळात जीव धोक्यात टाकून रुग्णसेवा करणा?्या वैद्यकीय अधिकारी आणि आरोग्य सेवेतील कर्मचाऱ्यांना बळ मिळावे व रुग्णांच्या सोयी सुविधे संदर्भात जाणून घेण्याच्या दृष्टीने खासदार सुनिल मेंढे यांनी जिल्हा सामान्य रुग्णालयात भेट दिली.

जिल्हा सामान्य रुग्णालयातील आरोग्य व्यवस्थेची पाहणी करण्यासाठी खासदारांनी रुग्णालयाला भेट दिली. यावेळी केंद्रीय मंत्री मा.ना.श्री.नितिन गडकरी यांच्या सौजन्याने आलेले मिनी व्हेंटिलेटर जिल्हा शल्य चिकित्सक यांना सुपूर्द करण्यात आले.

यावेळी त्यांनी ऑक्सीजन, औषधांचा पुरवठा, रुग्णांना वेळोवेळी आवश्यक असलेल्या सेवा याची माहिती जाणून घेत कमतरता पडू नये असे निर्देश दिले. प्रामाणिकपणे सेवा देणाऱ्या सर्व अधिकारी कर्मचाऱ्यांचे कौतुकही खासदारांनी केले. रुग्ण आणि त्यांच्या नातेवाईकांशी सौजन्याची वागणूक ठेवा असा सल्लाही यावेळी त्यांनी दिला.

यावेळी प्रभारी जिल्हा शल्य चिकित्सक डॉ.शेखर नाईक, डॉ.निखिल डोकरीमारे, डॉ.मुकेश थोटे आदी उपस्थित होते.

# रेमडीसीवीर औषधीचा काळाबाजार करणाऱ्या टोळीचा पर्दाफाश




**गोंदिया**-स्थानिक गुन्हे शाखेने ४ मे रोजी रेमडीसीवीर व मिथिल प्रेडनिसोलोनी सोडीयम इंजेक्शनचा काळाबाजार करणाऱ्या टोळीचा पर्दाफाश केला. पोलिसांनी या टोळीतील तिघांना अटक केली असून त्यांच्याजवळून ४३ हजार ७० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

छोटा गोदिया परिसरात राहणारा व रुग्णवाहिका चालक असलेला अमोल चौधरी हा रेमडीसीवीर इंजेक्शन जादा दराने विकत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. याआधारे माहितीची खात्री पटविण्यासाठी पोलिसांनी बनावटी ग्राहकाला त्याच्याकडे पाठविले असता तो इंजेक्शनचा काळाबाजार करीत असल्याचे निष्पन्न झाले. त्यामुळे त्याला पुरणसिंह चौकात अटक केली.

त्याच्या चौकशीत त्याने सदर इंजेक्शन हे बहेकार हॉस्पीटलमध्ये सफाई कामगार असलेल्या संजय रमेश तुरकर यांच्याकडून घेतल्याचे सांगितले. त्याआधारे पोलिसांनी संजय तुरकर याच्या घरी धाड टाकून तपासणी केली असता दोन मिथिल प्रेडनिनसोनोन सोडीयम इंजेक्शन आढळून आले. याबाबत त्याने रेमडीसीवीर व सदर इंजेक्शन हे बहेकार हॉस्पीटलमध्ये परिचारिका असलेल्या महिलेकडून आणल्याचे कबूल केले. याआधारे पोलिसांनी तीनही आरोपींना अटक केली असून त्यांच्याजवळून इंजेक्शन व दोन मोबाईल असा एकूण ४३ हजार ७० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. आरोपींवर भादंवि ४२०, १८८, ३४, औषध नियंत्रण किंमत आदेश, जीवनाश्यक वसतू अधिनियमन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कारवाई पोलिस अधीक्षक विश्व पानसरे यांच्या मार्गदर्शनात स्थागुशाचे पोलिस निरीक्षक बबन आव्हाड, पोलिस उपनिरीक्षक तेजेंद्र मेश्राम, अभयसिंह शिंदे, पोलिस कर्मचारी लिलेंद्रसिंह बैस, चंद्रकांत करपे, राजेंद्र मिश्रा, तुलसीदास लुटे, रेखलाल गौतम, इंद्रजीत बिसेन, महेश मेहर, अजय रहांगडाले, विजय मानकर, संतोष केदार, गेडाम यांनी केली.

# खरीप हंगामासाठी शेतकऱ्यांना वेळेत बियाणे व खतांचा पुरवठा करावा

## पालकमंत्री नवाब मलिक,खरीप हंगाम पूर्वतयारी आढावा सभा




**गोंदिया :** खरीप हंगामाच्या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांना रासायनिक खते, बी-बियाणे आणि कीटकनाशके सहज उपलब्ध झाली पाहिजे. लॉकडाऊनच्या काळात शेतकऱ्यांची गैरसोय होणार नाही याकडे प्रशासनाने लक्ष देऊन कृषी विभागाने नियोजन करून खरीप हंगामासाठी शेतकऱ्यांना वेळेत बियाणे व खतांचा पुरवठा करावा. असे निर्देश पालकमंत्री नवाब मलिक यांनी दिले.

२ मे रोजी जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन समितीच्या सभागृहात पालकमंत्री श्री मलिक यांच्या अध्यक्षतेखाली जिल्ह्याच्या खरीप हंगाम पूर्व तयारीची आढावा सभा आयोजित करण्यात आली. यावेळी ते बोलत होते. या बैठकीला खासदार सुनिल मेंढे, आमदार सर्वश्री अभिजीत वंजारी, विनोद अग्रवाल, मनोहर चंद्रिकापुरे व सहसराम कोरोटे, जिल्हाधिकारी दीपक कुमार मीना, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रदिपकुमार डांगे, पोलिस अधीक्षक विश्व पानसरे, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी गणेश घोरपडे यांची प्रमुख उपस्थिती होती.

पालकमंत्री श्री मलिक म्हणाले, कृषी विभागाने समन्वय साधून रासायनिक खते, बि-बियाणे, शेतीशी संबंधित अवजारे, फवारणी यंत्रे व कीटकनाशके आदी बाबींची शेतकऱ्यांना उपलब्धता करून देतांना पिक विमा कंपन्यांच्या अधिकाऱ्यांसोबत बैठक घेऊन जिल्ह्यातील जास्तीत जास्त शेतकऱ्यांना पीक विमा सहज आणि सुलभ पद्धतीने कसा काढता येईल यादृष्टीने नियोजन करावे. पारंपारिक पिकांसोबतच जिल्ह्यातील जास्तीत जास्त शेतक?्यांना नगदी पिके घेण्यास प्रोत्साहित करावे, असे त्यांनी सांगितले.

जिल्ह्यातील ज्या शेतकऱ्यांचे वीज कनेक्शन प्रलंबित असतील त्या शेतकऱ्यांना वीज वितरण कंपनीने तातडीने वीज कनेक्शन दयावे. सामान्य शेतकऱ्यांना बँकांनी पीक कर्ज वाटप करावे. खरीप हंगाम सन २०२१-२२ करिता जे नियोजन केले आहे त्याची कृषी विभागाने प्रभावी अंमलबजावणी करावी असे निर्देशही त्यांनी यावेळी दिले.

खासदर सुनिल मेंढे म्हणाले, जिल्ह्यातील ५२८१ वीज कनेक्शन प्रलंबीत आहेत याबाबत कार्यवाही करण्यात यावी. लोकप्रतिनिधींना विश्वासात घेवून नाविण्यपूर्ण योजना राबवाव्यात. सामुहिक शेततळे अजून वाढविण्यात यावे. नरेगाची कामे मोठ्या प्रमाणात करण्यात यावे असे त्यांनी सांगितले.

आमदार अभिजित वंजारी म्हणाले, कृषि केंद्रातून अप्रमाणित खते विक्री होत आहेत. अशा खते विक्रेत्यांवर अंकूश ठेवून योग्य ती कार्यवाही करण्यात यावी असे त्यांनी सांगितले.

आमदार चंद्रिकापुरे म्हणाले, वन जमिनीचे पट्टे प्रशासन स्तरावर प्रलंबीत आहेत ते निकाली काढण्यात यावे. प्रमाणपत्रावर सरकार नाव असल्यामुळे शेतकऱ्यांचे धान खरेदी करीत नाही याकडे त्यांनी लक्ष वेधले.

आमदार अग्रवाल म्हणाले, खते-बियाणे प्रमाणित करण्यासाठी जिल्ह्यात प्रयोगशाळा निर्माण करण्याची आवश्यकता आहे.

फळबाग योजनेबाबत कृषि विभागाने योग्य मार्गदर्शन करावे. जास्तीत जास्त ग्रामीण भागात फळबाग योजनेचा लाभ देण्यात यावा अशी सूचना आमदार कोरोटे यांनी केली.

पालकमंत्री यांनी खरीप हंगामासाठी जिल्ह्यातील शेतकऱ्यांना खते आणि बियाणे याचा वेळेत पुरवठा करणे बाबत सूचना दिल्या तसेच खरीप पेरणीसाठी आवश्यक तो कर्ज पुरवठा वेळेत करण्याबाबत सूचित केले. राष्ट्रीयकृत बँकांनी त्यांचे कर्ज पुरवठ्याची उद्दिष्ट पूर्ण करावे अशा सूचना देण्यात आल्या.

रब्बी उन्हाळी हंगामात उत्पादन होणारे धान खरेदी करण्या बाबतच्या नियोजनाचा आढावा घेण्यात आला. सदरचे धान खरेदी करण्यासाठी गोदामांची व्यवस्था अपुरी असल्यामुळे याबाबत शासन स्तरावर बैठक घेऊन योग्य तो निर्णय घेण्यात येईल, असे पालकमंत्री यांनी सुचित केले.

मागील खरीप हंगामात ज्या शेतकऱ्यांनी पीक विमा योजनेत भाग घेतला होता त्यापैकी अनेक शेतकरी पिक विमा कंपनीच्या चुकीच्या धोरणामुळे नुकसान भरपाई मिळण्यापासून वंचित आहेत. जिल्ह्यातील चार महसूल मंडळातील शेतकऱ्यांना पिक विमा कंपनीने चुकीची आकडेवारी वापरून नुकसान भरपाई पासून वंचित ठेवले असल्याचे उपस्थित आमदार यांनी निदर्शनास आणून दिले.

जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी श्री घोरपडे यांनी खरीप हंगाम पूर्व तयारीची माहिती देतांना सांगितले की, जिल्ह्यातील २ लाख २० हजार २४६ हेक्टर क्षेत्रावर पिके घेण्याचे नियोजन आहे. भात पीक १ लाख ९० हजार हेक्टर क्षेत्रावर घेण्याचे प्रस्तावित आहे. सन २०२१-२२ या वर्षात ३०० कोटी रुपये खरीप हंगामात पीक कर्ज वाटपाचे उद्दिष्ट गोंदिया जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, ग्रामीण बँक, राष्ट्रीयकृत व व्यापारी बँकांकडून प्रस्तावित आहे. सोबतच त्यांनी प्रस्तावित नियोजनामधील महत्त्वाच्या बाबींची माहिती दिली.

सभेला माजी आमदार राजेंद्र जैन, नगराध्यक्ष अशोक इंगळे, अपर जिल्हाधिकारी राजेश खवले, निवासी उपजिल्हाधिकारी जयराम देशपांडे, उपजिल्हाधिकारी सुभाष चौधरी, जिल्हा पणन अधिकारी भारतभुषण पाटील, जिल्हा उपनिबंधक शुध्द-ोधन कांबळे, जि.प. उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य) नरेश भांडारकर, उपविभागीय अधिकारी वंदना सवरंगपते, तहसिलदार आदेश डफळ, अपर तहसिलदार अनिल खडतकर, तालुका कृषि अधिकारी धनराज तुमडाम यांच्यासह कृषी विभागाच्या अधिकाऱ्यांची उपस्थिती होती.

# पन्नास हजार नोंदणीकृत कामगारांनी अनुदानाची प्रतीक्षा

**गोंदिया:** राज्यात मागील १४ एप्रिल रोजीपासून संचारबंदी लागू करण्यात आली आहे. त्यामुळे अनेक कामगारांचा रोजगाराचा प्रश्न निर्माण झाला आहे. संचारबंदीच्या काळात राज्य शासनाकडून डिबीटीच्या माध्यमातून नोंदणीकृत कामगारांच्या बँक खात्यात १ हजार ५०० रुपयाचे अनुदान देण्याचे जाहीर केले आहे. या अनुषंगाने जिल्ह्यातील ५० हजार कामगारांना या योजनेचा लाभ मिळणार आहे. शासनाकडून मागील काही कामगारांची नोंदणी करण्यात आली होती.



या अंतर्गत जिल्ह्यात ५० हजार कामगारांच्या नावाची नोंदणी केली होती. दरम्यान मागच्या वर्षीपासून देशात कोरोनाने थैमान घातल्याने संपूर्ण देशात टाळेबंदी करण्यात आली होती. तर यंदाही तीच परिस्थिती निर्माण झाली असून राज्यात कोरोनाच्या दुसऱ्या लाटेने चांगलाच कहर केला आहे. परिणामी राज्य शासनाकडून टाळेबंदी करण्यात आली आहे. त्यातच आता या टाळेबंदीत १५ मेपर्यंत वाढ करण्यात आली आहे मात्र करण्यात आलेल्या टाळेबंदीत केवळ अत्यावश्यक सेवा वगळता इतर सर्व प्रतिष्ठाने बंद ठेवण्याचे आदेश देण्यात आले असल्याने अनेकांवर बेरोजगारी संकट आले आहे.

हातावर कमावून खाणाऱ्यांचे बेहाल झाले आहे. अशावेळी नोंदणी केलेल्या कामगारांना राज्य शासनाकडून कामगार कल्याण योजनेंतर्गत महाराष्ट्र इमारत व इतर कामगार कल्याणकारी मंडळांतर्गत १ हजार ५०० रुपयाचे अनुदान देण्याचे जाहीर करण्यात आले. ही रक्कम सबंधित कामगारांच्या बँक खात्यात जमा करण्याचे निर्देशही संबधित विभागाला देण्यात आले आहे.

त्यापैकी काही कामगारांचे मृत्यू अथवा इतर बांधकाम कामगार कार्यरत आहेत तर ४ हजार घरगुती कामगारांची नोंदणी करण्यात आली आहे. असे ५० कामगार आजघडीला जिल्ह्यात आहेत. शासनाच्या वतीने या कामगारांच्या थेट बँक खात्यात अनुदानाची रक्कम वळती करण्यात येणार असल्याचे कामगार अधिकारी गुणवंत पंधरे यांनी सांगितले